मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■

नवे विचार...नवी सुरुवात

■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : १८५ ■ बुधवार, ०८ ऑक्टोबर २०२५ ■ किंमत: ३ रुपये ■ पाने : ४+२




## संक्षिप्त...

### दुचाकी वाहनाकरिता नवी मालिका

**सांगली : हॅलो प्रभात**

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सांगलीकरिता नव्याने नोंदणी होणाऱ्या दुचाकी वाहनांकरिता एम एच १० ई टी ही नवीन मालिका गुरूवार, दि. ९ ऑक्टोबरपासून सुरू करण्यात येणार आहे. ही माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रसाद गाजरे यांनी दिली आहे. एम एच १० ई टी या मालिकेव्यतिरिक्त इतर वाहनांसाठी आकर्षक क्रमांक हवा असेल तर तिप्पट फी भरून आकर्षक नोंदणी क्रमांक देण्यात येईल.

### दिव्यांगांकरिता आरोग्य शिबीर संपन्न

**सांगली : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई, ग्रामपंचायत मौजे डिग्रज, सांगली मिशन हॉस्पिटल सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने ० ते १८ वयोगटातील दिव्यांग मुलांकरिता ग्रामपंचायत मौजे डिग्रज येथे आरोग्य शिबिरात ७० दिव्यांग मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

# कोल्हापूरात शिवसेनेची भूक वाढली ?

## जागावाटपाची ठिणगी पडली ; महायुतीतच ओढाताण

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

एकसंघ शिवसेनेने कोल्हापूर महापालिकेच्या निवडणुकीत गेल्या महापालिका निवडणुकीत अवघ्या चार जागांवर विजय मिळिवला होता, पण एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने कोल्हापुरात आपला राजकीय विस्तार वाढविला असून भाजप आणि राष्ट्रवादीकडून चार जागा देण्याची तयारी दर्शविली जात असली तरी ३५ हून अधिक माजी नगरसेवक, महापौर व अन्य पक्षांमधील नेत्यांना शिंदेसेनेने पक्षप्रवेश दिला असल्यामुळे शिवसेनेची भूक वाढली आहे, किमान ३० जागा देण्याची मागणी शिंदेसेना महायुतीकडे करत असली तरी यामुळे महायुतीत जागावाटपावरून संघर्ष पेटण्याची शक्यता निर्माण झालेली आहे असे राजकीय जाणकारांना वाटते आहे.

यापुर्वी काँग्रेस, भाजपच्या ३५ नेत्यांनी शिवसेनेत प्रवेश केला असल्यामुळे आणि त्यांना महापालिका निवडणुकीत उमेदवारी देण्याचा शब्द शिंदेसेनेच्या नेत्यांनी दिला असल्यामुळे, भाजप व राष्ट्रवादीच्या जागावाटपाच्या भूमिकेवरून कोल्हापूरात शिवसेना अडचणीत आली आहे. पुर्वी आलेले नेते आणि दुसऱ्या टप्प्यात आणखी काहीजणांचा पक्षप्रवेश करून घेऊन त्यांना राजकीय अभय देण्याच्या प्रयत्नात शिंदेसेनेचे नेते आहेत. कोल्हापूर महापालिका निवडणुकीत महायुतीत पहिल्यापासूनच जागा वाटपावरून ठिणगी पडली आहे. २०१६ च्या महापालिका निवडणुकीत ज्या ३४ जागा भाजप-ताराराणी आघाडीला मिळाल्या, त्या जागा सोडून उर्वरित जागांवर वाटप व्हावे अशी भूमिका भाजपची आहे, तर गेल्या निवडणुकीत ४ जागा घेतलेल्या शिवसेनेने यावेळी ३० पेक्षा अधिक जागांवर दावा केला आहे.





राज्य नियोजन मंडळाचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी महापालिका निवडणुकीत कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांची जबाबदारी घेतली आहे, तर दुसरीकडे संपूर्ण महापालिका निवडणुकीची जबाबदारी पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या खांद्यावर आहे. शिवसेनेचे कोल्हापूर जिल्हा समन्वयक सत्यजित उर्फ नाना कदम यांची भूमिकादेखील महापालिका निवडणुकीत महत्वाची ठरणार आहे.

यापुर्वी महायुती म्हणून लढत असताना राष्ट्रवादीला जमेत न धरल्याची भूमिका मंत्री हसन मुश्रीफ यांनी व्यक्त केली होती, त्यामुळे नवाच पेच कोल्हापुरात निर्माण झाला होता, महायुतीत त्यावरून उफाळलेला संघर्ष कायम असतानाच महायुतीतील अन्य घटक पक्ष असलेल्या शिंदेसेनेला निवडणूक होण्याआधीच जागा मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. खा. धनंजय महाडिक आणि राज्याचे उच्चशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सुरुवातीपासूनच भाजपकडून महापालिका निवडणुकीत ३५ जागांच्या पुढे जागावाटप व्हावी अशी भूमिका घेतलेली आहे. २०१६ च्या निवडणुकीत भाजपने १४ आणि ताराराणी आघाडीने १९ जागांवर विजय मिळिवला होता, भाजप आणि ताराराणी आघाडी एकत्र असल्याने हक्काच्या जागा मिळिवण्यासाठी भाजपने आतापासूनच व्यूहरचना करण्यास सुरूवात केली आहे.

एकसंध राष्ट्रवादी काँग्रेसने गेल्या निवडणुकीत १४ जागांवर विजय मिळिवला होता. त्यामुळे भाजप आणि राष्ट्रवादीकडून ३४ आणि १४ जागांवर सुरुवातीपासूनच दावा केला जात आहे. अशातच शिवसेनेकडून ३० जागांचा दावा केला जात आहे. भाजपने ३४, राष्ट्रवादीच्या १४ आणि शिवसेनेच्या चार जागा सोडल्या तर उर्वरित जागांवर जागा वाटप करावे, अशी भूमिका भाजपची आहे.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिंदेसेनेने काही काँग्रेसचे आणि भाजपचे नगरसेवक फोडल्याने त्या जागांवर शिवसेनेचा दावा आहे. मात्र भाजपमधील इच्छुकांची संख्या पाहता शिवसेनेला या जागा मिळवण्यासाठी जीवतोड प्रयत्न करावे लागणार आहे असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

# बारामती नगरपरिषद प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर 'खुला'

### अजित पवारांच्या निवडीची उत्सुकता ; दिवाळीपूर्वीच राजकीय फटाक्यांच्या आतषबाजीची शक्यता

**बारामती : हॅलो प्रभात**

नऊ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर बारामती नगर परिषदेच्या निवडणुकीला अखेर सुरुवात झाली आहे. सोमवारी राज्यातील नगर परिषद व नगरपंचायतींच्या नगराध्यक्षपदासाठी जाहीर झालेल्या आरक्षण सोडतीत बारामतीतील पद 'खुला प्रवर्गासाठी' राखीव ठेवण्यात आले.

यामुळे राजकीय नेत्यांमध्ये उत्साहाची लहर उसळली असून, इच्छुक उमेदवारांनी आता मोर्चेबांधणीस सुरुवात केली आहे. दिवाळीपूर्वीच बारामतीत राजकीय फटाक्यांची आतषबाजी होण्याची शक्यता आहे.

बारामती नगर परिषदेची शेवटची निवडणूक डिसेंबर २०१६ रोजी झाली होती, तर तिची मुदत १८ फेब्रुवारी २०२२ रोजी संपली. त्यानंतर तीन वर्षांहून अधिक काळ प्रशासकांचे राज्य चालू होते. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आता निवडणूक प्रक्रियेला वेग आला असून, नगर परिषदेच्या २० प्रभागांतून ४१ नगरसेवकांची निवड होणार आहे.



नऊ वर्षांच्या खंडानंतर ही निवडणूक होत असल्याने कार्यकर्ते व पदाधिकारी जोरदार तयारीला लागले आहेत. नगराध्यक्षपदावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे एकहाती वर्चस्व असल्याने, त्यांच्या निवडीबाबतची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

राजकीय वातावरणात महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील लढत असण्याचे संकेत मिळत आहेत. अजित पवार महायुतीतील मित्रपक्ष भाजप व एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेनेला सोबत घेऊन निवडणूक लढवणार का, यावरच लढतीचे चित्र ठरेल.

दरम्यान, नगराध्यक्षपद खुला असल्याने इच्छुक नेत्यांची 'भाऊगर्दी' वाढली असून, प्रत्येकजण राजकीय रणनीती आखण्यात व्यस्त आहे. यंदा नगराध्यक्षाची निवड नगरसेवकांमधून होणार असल्याने, प्रक्रिया अधिक रोचक ठरणार आहे.

### पुढील आरक्षण प्रक्रिया बुधवारी

**नगराध्यक्ष आरक्षणानंतर आता नगरसेवकांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आरक्षण निश्चित होणार आहे. अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरी मागासवर्गीय महिला व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण सोडत बुधवारी (८ ऑक्टोबर) शरदचंद्र पवार सभागृहात काढली जाईल. ९ ऑक्टोबर रोजी हे आरक्षण जाहीर होईल, तर ९ ते १४ ऑक्टोबरदरम्यान हरकती व सूचना सादर करण्याची मुदत असेल.**

• **पंकज भुसे** (मुख्याधिकारी)

# गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी एआयचा प्रभावी वापर आवश्यक : डॉ.शंकर मंथा

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हे केवळ तांत्रिक प्रगतीचे साधन नाही, तर शिक्षणाच्या परिणामकारकतेसाठी आणि गुणवत्तेसाठीचे एक शक्तिशाली माध्यम असल्याचे प्रतिपादन ख्यातनाम शिक्षण तज्ञ, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेचे (एआयसीटीई) माजी अध्यक्ष आणि नागपूर येथील रामदेवबाबा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ शंकर मंथा यांनी केले.

डी.वाय.पाटील अभिमत विद्यापीठ कोल्हापूर येथे आज सोमवारी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (अख) वापरावर आधारित दोन विशेष तज्ज्ञ व्याख्याने पार पडली. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या (आयक्यूएसी) वतीने या व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मार्गदर्शन करताना डॉ मंथा यांनी शिक्षण शेत्रातील एआयच्या प्रभावी वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी कुलगुरू डॉ. राकेश कुमार शर्मा, कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले, आयक्यूएसी संचालिका डॉ. शिंपा शर्मा, प्रा. डॉ. अजित पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.




आउटकम बेस्ड एज्युकेशनमध्ये एआयचा वापर' याविषयावर मार्गदर्शन करताना गुणवत्तापूर्ण शिक्षण व असमानता कमी करणे या उद्दिष्टांवर चर्चा झाली. यावेळी डॉ मंथा म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता ही केवळ तांत्रिक प्रगतीचे साधन नाही, तर शिक्षणाच्या परिणामकारकतेसाठी एक शक्तिशाली माध्यम आहे. एआयचा योग्य वापर केल्यास विद्यार्थ्यांची शैक्षणिक समज व एकदार प्रवासाचे अचूकपणे मोजमाप करता येते. एआयच्या माध्यमातून हे शिक्षण अधिक वैयक्तिक, विश्लेषणाधारित आणि परिणामाभिमुख बनवते.

'क्वालिटी अशुरन्समध्ये एआयचा वापर' या विषयावरील दुसऱ्या सत्रात डॉ मंथा यांनी रोजगारक्षम विकास आणि संस्थात्मक पारदर्शकता यांवर भर दिला. ते म्हणाले, एआयच्या वापरामुळे शिक्षण संस्थांमधील पारदर्शकता, निर्णयप्रक्रिया आणि कार्यक्षमता वाढते. यावेळी डॉ. मंथा यांनी उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

कुलगुरू डॉ.राकेश कुमार शर्मा म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता शिक्षणाच्या प्रत्येक घटकाला नवीन दिशा देत आहे. आमच्या विद्यापीठातही एआयच्या वापरावर भर दिला जात आहे.

आयक्यूएसी संचालिका डॉ. शिंपा शर्मा म्हणाल्या, आउटकम बेस्ड एज्युकेशन आणि क्वालिटी अशुरन्समध्ये एआयचा वापरचा वापर हा शिक्षण संस्थांच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी या उपक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमांना विद्यापीठातील प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कुलपती डॉ. संजय डी. पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील यांचे या उपक्रमासाठी मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

# 'संजयकाका' आज कार्यकर्त्यांशी संवाद साधणार

### राजकीय भूमिकेबाबत उत्सुकता

**तासगाव : हॅलो प्रभात**

आगामी नगरपालिका, जिल्हा परिषद, आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमिवर तासगाव-कवठेमहांकाळ मतदारसंघातील राजकीय घडामोडींना वेग आला असून याच अनुषंगाने माजी खासदार संजयकाका पाटील हे येत्या बुधवार दि.८ ऑक्टोबर २०२५ रोजी तासगाव येथे त्यांच्या कार्यकर्त्यांशी 'संवाद बैठक' द्वारे संवाद साधणार आहेत. या बैठकीत ते पुढील काळातील आपली राजकीय भूमिका स्पष्ट करण्याची शक्यता असल्याने राजकीय वतुर्ळात मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.



माजी खासदार संजयकाका पाटील यांनी तासगाव-कवठेमहांकाळ तालुक्यात कार्यकर्त्यांचे मोठे जाळे आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर कार्यकर्त्यांना योग्य दिशा देण्यासाठी तसेच त्यांची मते जाणून घेण्यासाठी या संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

जनाई मंगल कार्यालय, विटा रोड, तासगाव येथे दुपारी २.०० वाजता ही बैठक होणार आहे.

### राजकीय भूमिकेकडे जिल्ह्याचे लक्ष

विशेषत: जिल्हा परिषद आणि पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकांमध्ये पाटील यांची भूमिका काय असणार ? कोणत्या पक्षासोबत किंवा नेतृत्वाखाली ते निवडणुकीला सामोरे जाणार? याबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. तासगाव आणि कवठेमहांकाळमधील कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या मेळाव्यात संजयकाका पाटील हे जिल्ह्याच्या राजकारणा संदर्भात मोठी आणि स्पष्ट भूमिका जाहीर करण्याची शक्यता आहे. त्यांच्या या भूमिकेचा परिणाम आगामी निवडणुकांवर आणि स्थानिक राजकारणाच्या समीकरणांवर नक्कीच होणार आहे. त्यामुळे संजयकाका पाटील यांच्या भूमिकेकडे तासगाव-कवठेमहांकाळ तालुकाच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे.

# शरद लाड यांचा भाजपामध्ये प्रवेश

**मुंबई : हॅलो प्रभात**

शरद पवार गटाचे पुणे विभाग पदवीधर आमदार अरुण लाड यांचे पुत्र, क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांचे नातू शरद लाड यांनी मंगळवारी अनेक समर्थकांसह भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. मुरगूडचे माजी नगराध्यक्ष प्रवीण पाटील यांच्यासह सांगली, कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यातील अनेक कार्यकर्त्यांनीही भाजपामध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी या सर्वांचे पक्षात स्वागत केले. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमावेळी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री व सांगलीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, आ. सुधीर गाडगीळ, आ. सत्यजीत देशमुख, आ. मनोज घोरपडे, आ. पृथ्वीराज देशमुख, आ.अमल महाडिक, सांगली भाजपा जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, जनसुराज्यचे समित कदम, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते.

यावेळी श्री. चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मोठ्या ताकदीने महाराष्ट्राच्या विकासाला गती देण्याचे काम करत आहेत. पंतप्रधान मोदीजी यांच्या नेतृत्वामुळे नवभारत घडत आहे. आज जगाचा भारताकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलतोय. ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे देशाची वाटचाल सुरू आहे. तुम्हा सर्वांचे स्वप्न साकार करण्यासाठी भाजपा कटीबद्ध आहे. बारा बलुतेदारांना न्याय देऊन उन्नती साधण्याचे काम सुरू आहे. ज्या विश्वासाने आज सर्वांनी भाजपामध्ये प्रवेश केला त्यांच्या विश्वासास आम्ही पात्र ठरू अशी ग्वाही श्री. चव्हाण यांनी दिली.

### मुरगूडचे माजी नगराध्यक्ष प्रवीण पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्ते भाजपामध्ये



मोठ्या संख्येने भाजपामध्ये होत असलेले प्रवेश पाहता विरोधकांना आगामी निवडणुकांमध्ये उमेदवार शोधण्याची पाळी येणार आहे असे सांगलीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन शरद लाड आणि आज होत असलेल्या इतर प्रवेशांमुळे भाजपाची ताकद परिसरात वाढणार आहे, असेही त्यांनी नमूद केले.

श्री.लाड म्हणाले की,पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कार्यकुशलता, दूरदृष्टी यांने प्रभावित होऊन विकासासाठी भाजपामध्ये प्रवेश करत आहे.द्रष्टे नेते पाठीशी असतील तर देश आणि राज्याचा विकास नक्की होणार हा विश्वास सर्वांना आहे. पलुस कडेगावचा युवक भाजपाकडे आशेने बघत आहे. प्रत्येक कार्यकर्त्याच्या सुखदु:खात सहभागी असलेला पक्ष भाजपा, याकडे आम्ही आकृष्ट झालो. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक आणि पदवीधर निवडणुकीत भाजपाच्या विजयासाठी झोकून देऊन काम करू अशी ग्वाहीही श्री. लाड यांनी दिली.

सांगलीतून शरद लाड यांच्यासोबत क्रांती साखर कारखाना माजी उपाध्यक्ष पोपट सकपाळ, कारखान्याचे माजी संचालक पोपट फडतरे, माजी जि.प. सदस्य नितीन नवले, ब्रह्मनाळचे उपसरपंच सुभाष वडेर, उपसरपंच संभाजी पाटील, महेंद्र करांडे, भगवंत पाटील आदींचा समावेश आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातून राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपामध्ये प्रवेश केलेल्यांमध्ये श्री विठ्ठल रखुमाई विकास सेवा संस्थेचे चेअरमन दिग्विजय पाटील, विश्वनाथराव पाटील, कला क्रीडा सांस्कृतिक व्यायाम मंडळाचे अध्यक्ष सत्यजित पाटील, माजी नगरसेवक जगन्नाथ पुजारी, एम .बी.मेंडके, संपत कोळी, गजानन साळोखे, रामचंद्र चौगुले, सामाजिक कार्यकर्ता सम्राट मसवेकर आदींचा समावेश आहे.

# संपादकीय

## यासाठी दीर्घकालिक उपायांची गरज

अतिवृष्टीने निर्माण झालेल्या पूरस्थितीने जनजीवन विस्कळीत केले. नदी-नाल्यांनी तटबंदी ओलांडून गाव, शेते जलमय केली. तातडीच्या मदतीबरोबरच दीर्घकालीन उपाय, स्थानिक आपत्ती आराखडे आणि शेतकऱ्यांसाठी न्याय्य नुकसानभरपाई अत्यावश्यक आहे. मराठवाडा व परिसरात पावसाच्या अवकृपेमुळे हाहाकार उडाल्यानंतर आता दोन-तीन आठवडे उलटून गेले. कमी वेळात विक्रमी मुसळधार पाऊस पडल्याने गोदावरी, सिना, पूर्णा या मोठ्या नद्यांसकट सर्व नद्यांना महापूर आले. मागील महिन्याच्या अखेरीस झालेल्या अनपेक्षित व अवकाळी अतिवृष्टीमुळे परंडा तालुक्यातील सीना नदी आणि तिच्या उपनद्या-बाणगंगा, खासापूर व इतर ओढ्यांतून पाणी तुडुंब वाहू लागले. केवळ तीन ते चार तासांच्या अवधीत १५० ते २०० मिलीमीटर पावसाची नोंद झाली. या पुरामुळे शेती, जनजीवन, वाहतूक, पूल, रस्ते आणि जनावरांचे मोठे नुकसान झाले. जायकवाडी धरण भरून वाहू लागल्याने पाण्याचा महाप्रचंड विसर्ग करण्यात आला. मराठवाड्यातील दुष्काळी जिल्ह्यांना अगदी जेमतेम पाणीपुरवठा करणाऱ्या या प्रकल्पातून धो-धो पाणी वाहू लागलं. कालवे, नद्या आपापल्या काठांच्या मर्यादा तोडून गावा-गावात, शेत-शिवारात घुसल्या. शेते, घरे पाण्याने भरून गेली, पिकं आडवी होऊन नासून गेली. घरादारात पाणी शिरून, सगळ्या सामानाची वाट लागली. लोक जीव वाचवत घर सोडून पळाले.

अशा प्रकारचे अभूतपूर्व संकट कोसळल्यावर, संकटाचा सामना करावा लागणाऱ्या जनतेच्या हालअपेष्टांना पारावार राहात नाही. अनेक समाजसेवी संस्था-संघटना मदतकार्यासाठी पुढे सरसावतात. राज्य शासन व स्थानिक प्रशासन यंत्रणा आपल्यापरीने कामाला लागते. अशावेळी मदतकार्य, पुरामुळे झालेली कायमस्वरूपी पडझड, दलदल आदींची डागडुजी करण्यासाठी श्रम पथके आणि आरोग्य सुविधा पुरवण्यासाठी सेवा पथके ही तातडीची गरज असते. महापुराचे संकट दिसताना अस्मानी दिसत असले तरी ते मुळात मानव निर्मित आहे, याचे भान सर्वसामान्य जनतेत या निमित्ताने जागवणे व शासन यंत्रणेला याची आठवण करून देणे आवश्यक आहे.

ही आपत्ती फक्त नैसर्गिक नव्हती; धरण व्यवस्थापनातील त्रुटी, पाणी सोडण्याच्या अनियमित पद्धती आणि नदी खोलीकरणाच्या अभावामुळे परिस्थिती अधिक भीषण बनली. क्लायमेट चेंजमुळे उद्भवणाऱ्या नैसर्गिक स्थितीच्या भीषण परिणामांना जबाबदार आपण ठरू नये एवढी दक्षता प्रत्येक देशाला, तिथल्या सरकारांना घ्यावीच लागणार आहे. ढगफुटीसदृश अतिवृष्टी ही स्थिती आता नवी राहिलेली नाही. मराठवाड्यासारख्या ठिकाणी, जिथे 'पाणी पडू दे रे पावसाचे', अशी याचना करावी लागते, तिथे एकाच वेळी महिनाभराचा किंवा वर्षभराचाही पाऊस पडून जाणे, फेब्रुवारी महिन्यात गारपीट होणे हा निसर्गाचा इशारा जाणायला हवा आणि त्यानुसार जलनियोजन आणि स्थलनियोजनही करायला हवं. आपत्ती कोसळल्या कोसळल्या एनएपीएमचे राज्यभरातील सहकारी कामाला लागले. निधी गोळा करण्याच्या आवाहनाला नागरिकांचा भरघोस पाठिंबा मिळाला. एनएपीएमच्या राष्ट्रीय समन्वयक सुनीती सु. र., युवराज ते. श्री., राज्य समन्वयक सुजय मोरे व अन्य सहकाऱ्यांची टीम मागील आठवड्यात सोलापूर व धाराशिव जिल्ह्यात सक्रिय होती. त्यावेळी समजलेली वास्तविकता आणि त्यातून काढलेली प्राथमिक अनुमाने पुढीलप्रमाणे आहेत.

गावागावांमध्ये पत्रे उडून गेलेली घरे; दलदल झालेल्या जमिनी; घरांमधून, शाळांमधून अद्यापही साचून असलेला गाळ आणि दलदल, यामुळे साफसफाई करून घरे राहण्यासारखी करणं अवघड, अशी बऱ्याच ठिकाणी स्थिती आहे. दोन किलोमीटरवर असलेली नदी घरांना गिळून आणखी पलीकडे पोहोचते, ही स्थिती अभूतपूर्वच होती. सरकारी यंत्रणेकडून इशारा देण्यात आला होता आणि सुरक्षित स्थळी हलावयास सांगितले गेले होते, असे बहुतेक सर्व गावांमध्ये कळले. तुम्हाला हलवण्यासाठी सरकारने काही व्यवस्था केली होती का किंवा सरकारने सुरक्षित स्थळी नेले का, याचे उत्तर मात्र सर्वांनीच 'नाही' असे दिले. गावातल्याच ट्रॅक्टर वगैरेच्या मदतीने लोक थोड्या उंचावर जाऊन राहिले. अनेक गावांमध्ये घरांचे मोठे नुकसान झाले असून, शेतजमिनींवर जाड गाळ साचल्यामुळे शेतीची पुनर्रचना अत्यंत कठीण बनली आहे. पूरग्रस्त नागरिकांनी शासनाकडून झालेल्या अपुऱ्या मदतीबद्दल तसेच पुनर्वसनाच्या प्रश्नांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

उन्हाळ्यातच स्थानिक धरण नियमानुसार वेळेपूर्वी भरून घेतले गेले, ज्यामुळे पावसाळ्यात अतिरिक्त पाणी साठवण्याची क्षमता शिल्लक राहिली नाही. अचानक झालेल्या अतिवृष्टीमुळे धरणातून पाणी सोडावे लागले आणि परंडा येथील पुलासाठीचा पर्यायी रस्ता पुरात वाहून गेला. सोयाबीन, तूर, कांदा यासारख्या प्रमुख पिकांचा संपूर्ण नाश झाला. शेतामधली मातीही वाहून गेल्यामुळे खालचा दगड उघडा पडला आहे. तिथे शेती करणं आत्ता तरी अशक्य आहे. तिथे पुन्हा गाळ आणून पसरला गेला तरच इथे पुन्हा शेती होऊ शकते आणि ती क्षमता व जबाबदारी फक्त सरकारचीच आहे. शेतीच्या पुनर्बांधणीसाठी, त्यामध्ये माती आणून टाकण्यासाठी सरकारने केवळ काही रक्कम देणे पुरेसे नाही, तर युद्धपातळीवर यंत्रसामुग्री लावून पुन्हा गाळ आणि मातीने शेतीयोग्य करणे हेच सरकारने करायला हवे. पंचनामे अद्याप पूर्ण न झाल्याने, शेतकऱ्यांना नुकसानभरपाईबाबत संभ्रम आहे. जनावरांचे गोठे, धान्य व घरगुती साहित्यही वाहून गेले. विमा हप्ते भरले असूनही शेतकऱ्यांना एक रुपयाही विमा परतावा मिळालेला नाही. शासन सरासरी दराने नुकसानभरपाई देत असल्याने, प्रत्यक्ष नुकसानाशी त्याचा ताळमेळ नाही.

शेतकऱ्यांच्या शेतांचे पंचनामे होत आहेत. त्यांना देऊ केलेली नुकसानभरपाई अक्षरशः क्रूर चेष्टा आहे. नुकसानभरपाईही एक रकमी नाही तर स्थिती पूर्ववत होईपर्यंत त्यांना जगण्यासाठीची तरतूद म्हणून मासिक स्वरूपात देणे आवश्यक आहे. सगळ्या बायकांना भेडसावणारी मोठी चिंता म्हणजे त्यांचे बचत गटाचे किंवा मायक्रो फायनान्समधून घेतलेल्या कर्जाचे हप्ते फेडण्याची. आधीच कुठलीही सेव्हिंग नसलेल्या या वर्गाचा तोच एकमेव आधार असतो अडीअडचणीसाठी. आता हप्ते भरा, नाहीतर दंड लागेल असा तगादा आठ दिवसांतच सावकारांनी लावलेला आहे.

दीर्घकालीन म्हणून सीनासारख्या नद्या व उपनद्यांचे खोलीकरण, काठबांध आणि जलनियंत्रण आराखडा तयार करणे, धरण नियंत्रण धोरणाचे पुनर्विलोकन करून साठवण क्षमता व जलसोड नियम ठरविणे, स्थानिक लोकसहभाग व ग्रामस्तरीय आपत्ती समित्या स्थापन करणे व हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पूरप्रवण क्षेत्रांसाठी स्थायी आपत्ती आराखडा तयार करणे गरजेचे आहे.

# जगातल्या पहिल्या पाच उत्कृष्ट दलातील एक... भारतीय वायुसेना...

**हॅलो प्रभात**

**आजपासून ९२ वर्षांपूर्वी ८ ऑक्टोबर १९३२ साली पहिल्या हवाई दलाची स्थापना झाली. भारतीय संरक्षण दलांच्या पाच मुख्य विभागांपैकी भारतीय वायुसेना एक असून तिच्यावर भारताच्या वायुक्षेत्राचे रक्षण करण्याची व भारतासाठी हवाई युद्ध करण्याची जबाबदारी आहे. भारतीय हवाई दल जगातल्या पहिल्या पाच उत्कृष्ट दलातील एक मानले जाते.**

पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धांत इंग्लंड, जर्मनीने विमानाचा केलेला उपयोग पाहून 'हवाई युद्ध' हे युद्ध शास्त्राचे नवे अंग स्थापन झाले. त्यानंतर सर्व लहान-मोठ्या राष्ट्रांनी हवाईदले स्थापण्यास सुरुवात करताना, ब्रिटिशांनी भारतात रॉयल इंडियन एअरफोर्सची स्थापना केली. १९२८ मध्ये ६ भारतीयांनी प्रशिक्षण घेऊन १९३३ मध्ये पहिली भारतीय वैमानिकाच्या प्रशिक्षित तुकडी बाहेर पडली. सुब्रोतो मुखर्जी हे भारताचे पहिले वायुसेना प्रमुख होते. ८ नोव्हेंबर, इ.स. १९३२ मध्ये भारतीय वायुसेनेची स्थापना झाली. सुब्रोतो मुखर्जी हे पहिले भारतीय एका स्क्वाड्रनचे वायुदलातले प्रमुख होते. १२ मार्च इ.स. १९४५ रोजी वायुदलाचे नाव रॉयल इंडियन एअर फोर्स झाले. इ.स. १९४७ मध्ये विमानांना पिस्टन वर चालणारी इंजिने बसवलेली असत. जेट इंजिनांच्या आगमनानंतर त्याची जागा नंतर वेगवान जेट विमानांनी घेतली.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर वायुसेना स्वतंत्र सेवेत विकसित झाली. पहिल्या प्रजासत्ताक दिनी भारतीय वायुदलाने रॉयल शब्द वगळून फक्त 'इंडियन एअर फोर्स' (IAF) या नावाबरोबरच भगवद्गीतेतील 'नभः स्पृशं दीप्तम्' (Touch the sky with glory) हे बोधवाक्य स्वीकारले आणि चौकोनात डाव्या कोपऱ्यात राष्ट्रध्वज, त्याच्या समांतर उजव्या बाजूस केशरी, पांढरा व मधोमध हिरवा रंग असलेली आकाशाच्या निळसर पार्श्वभूमीवर वर्तुळ असे बोधचिन्हही निश्चित करण्यात आले. भारताचे राष्ट्रपती हे तिन्ही सशस्त्र दलाचे (भूदल, नौदल आणि वायुदल) सर्वोच्च कमांडरपद धारण करतात. भारताच्या हवाई दलांत ब्रिटिश, फ्रेंच, जर्मन बनावटीच्या विमानानंतर, रशियाच्या सहकार्याने लढाऊ, मालवाहू विमानांची भर पडत असतानाच १९६० मध्ये केंद्र शासनाने कानपूर येथे एअरक्राफ्ट मॅन्युफॅक्चरिंग डेपोत भारतीय हवाई दलाच्या मागणीनुसार, गरजेनुसार नवी विमान उत्पादन, दुरुस्ती सुरू केली. आज भारतीय हवाईदलाच्या ताफ्यात अत्यानुधिक विमानाची भर पडल्याने आपले वायुदल कोणत्याही आव्हानांचा सामना करण्यास पूर्णपणे सक्षम आहे. कोणत्याही देशाच्या परकीय आक्रमणापासून आपल्या देशाचे संरक्षण करणे, देशाच्या सर्व सीमारेषा शत्रूपासून सुरक्षित ठेवणे, तसेच आंतरिक समस्यांमध्ये आणि नैसर्गिक आपत्तीमध्ये देशातील नागरिकांचे रक्षण करणे, याशिवाय युद्धांत शत्रूचे हवाई संरक्षण दडपून टाकून, मानवतावादी ऑपरेशनना समर्थन देणे. अशी एक ना अनेक कामे भारतीय वायुसेना करीत असतात.

'गरुड कमांडो' या भारतीय हवाईदलाच्या विशेष दलात दहशतवादी विरोधी, ओलिसांची सुटका अशा विशेष ऑपरेशनचा सहभाग असून तेथे ५२ आठवड्यांचे मूलभूत प्रशिक्षण दिले जाते. वायुसेना ही भारताची मोठी ताकद असल्याने भारतीय हवाई दलातील नोकरी प्रतिष्ठेची मानली जाते. वायुदलांत प्रवेश घेण्यासाठी अनेक पातळीच्या




**८ ऑक्टोबर : भारतीय वायुसेनादिनानिमित्त**

परीक्षा आहेत. संरक्षण मंत्री राजनाथसिंह म्हणाले, फक्त सुरक्षित आणि मजबूत देशच यशाचे शिखर गाठू शकते. देश कितीही श्रीमंत किंवा ज्ञानाने परिपूर्ण असला तरी राष्ट्रीय सुरक्षितेची खात्री नसेल, तर समृद्धीला धोका संभवतो. लवकरच भारत संरक्षण उत्पादनाच्या गरजांमध्ये आत्मनिर्भर बनेल. आजादी का अमृत महोत्सवात २०२२च्या ९०व्या भारतीय वायुदलाच्या वर्धापनानिमित्ताने स्वदेशात डिझाइन आणि विकसित केलेले हलके लढाऊ हेलिकॉप्टर (एलसीएच) लाइट कॉम्बॅट हेलिकॉप्टर सामील करून घेतल्यामुळे भारतीय वायुदलाची क्षमता वाढली. हे हेलिकॉप्टर आधुनिक युद्ध तंत्राच्या गरजा पूर्ण करते.

स्वातंत्र्यानंतर झालेल्या युद्धांत आणि आंतरराष्ट्रीय मानवतावादी केलेल्या ऑपरेशनमध्ये विजय मिळवून देण्यात वायुदलाची खूप महत्त्वाची भूमिका होती. त्याचा थोडक्यात आढावा :-

१) द्वितीय विश्वयुद्धात जपानी सैन्य बर्माच्या दिशेने सरकताना आपल्या हवाई दलाने त्यांना रोखले, त्याच्या कॅम्पवर हल्ला करत त्यांना मागे धाडले. येथे भारतीय वायुदल ब्रिटिश आणि अमेरिकेला मदत करीत होते. या युद्धांचे हिरो फ्लाईट लेफ्टिनेट अर्जुनसिंह यांना २००२ मध्ये सरकारने मार्शल पद बहाल केले गेले. २) १९४७ ला भारत स्वतंत्र होताना झालेल्या भारत-पाकिस्तानच्या फाळणीत जम्मू-काश्मीरवर पाकिस्तानचे समर्थन असलेल्या कबिलाई हल्लेखोरांनी केलेल्या हल्ल्यात अडकलेल्या काश्मीरच्या लोकांना भारतीय हवाईदलाने बाहेर काढले. ३) काँगोमधील ७५ वर्षांचे बेल्जियमचे शासन १९६० साली संपल्यानंतर काँगोमध्ये सुरू झालेला हिंसेचा उद्रेक मोठा संघर्ष करून भारतीय वायुदलाने थांबविला. संयुक्त राष्ट्राच्या ग्राऊंड तुकडीसाठी एक हवाईतळ बनविला. १९६१ 'ऑपरेशन विजय'अंतर्गत पोर्तुगिजांचे कंट्रोल टॉवर, वायरलेस स्टेशन, हवामान केंद्र नष्ट करीत भारतीय वायुदलामुळे गोवा भारतात समाविष्ट झाले. ४) १९७१ मध्ये बांगलादेशाची निर्मिती भारतीय वायुदलामुळे झाली. ५) १९६५च्या दुसऱ्या काश्मीर युद्धात पाकिस्तानची अनेक लढाऊ विमाने, बेस कॅम्प उद्ध्वस्त करीत भारताने विजय मिळविला. आपलेही खूप नुकसान झाले. ६) 'ऑपरेशन मेघदूत'च्या अंतर्गत काश्मीर क्षेत्रातील शियाचिनवर हल्ला करून ते भारताच्या ताब्यात घेतले. ७) 'ऑपरेशन पवन'अंतर्गत श्रीलंकेला मदत करताना भारतीय वायुदलाने श्रीलंकेच्या १ लाख सुरक्षा दलातील सैनिकांना बाहेर काढले. ८) 'ऑपरेशन कॅक्टस'अंतर्गत मालदीवची राजधानी माले शहराला सशस्त्र गुन्हेगारांनी केलेला कब्जा भारतीय वायुदलाने सोडविला. ९) १९९९ कारगील युद्धात भारतीय वायुदलाने रणनीती बदलत मिराज आणि मिगच्या साथीने पाकिस्तानवर हल्ला करून विजय मिळविला. १०) बालकोट दहशतवादी संघटनेने १४ फेब्रुवारी २०१९ रोजी केलेल्या पुलवामा हल्ल्यात आपले ४६ जवान शहीद झाले. भारताचे वायुदल प्रमुख विरेंद्र सिंह धनोआ यांच्या नेतृत्वाखाली १५ दिवसांच्या आत धाडसी हल्ला करीत भारतीय वायुदलाने बालाकोटवर 'सर्जिकल स्ट्राइक' करत पाकिस्तानच्या आत घुसून मोठ्या संख्येने दहशतवाद्यांना ठार मारले. त्यांच्या जागा उद्ध्वस्त केल्या. दुसऱ्या दिवशी भारतीय वायुदलाने पाकिस्तानची लढाऊ विमाने भारतीय सीमेवर उड्डाण करताना पाहिली. त्यानंतर पाकिस्तानी विमानाची घुसखोरी रोखण्यासाठी विंग कमांडर अभिनंदन वर्धमान हे मिग-२१ या लढाऊ विमानातून पाठलाग करताना ते पाकिस्तानच्या हद्दीत शिरले गेले. एका क्षेपणास्त्राला धडकही झाली. नियंत्रण रेषेपासून फक्त ७ किलोमीटर अंतरावर त्यांचे विमान कोसळण्यापूर्वीही त्यांनी पाकिस्तानचे एक विमान पाडले. ६० तासांच्या पाकिस्तानी कडक चौकशीनंतर त्यांना सोडण्यात आले. या अभिनंदन वीराला भारताने २०१९ मध्ये 'वीरचक्र' देऊन सन्मानित केले. सामान्य नागरिकांना वायुसेनेबद्दल आपुलकी तेवढेच आकर्षणही असते. भारतीय वायुसेनेतील सैनिकांना सर्व देशवासियांचा प्रणाम!

## 'स्मार्ट सुनबाई' चित्रपटाचे पोस्टर अनावरण

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

मराठी चित्रपट सृष्टीतील चर्चेत असलेला आगामी सिनेमा 'स्मार्ट सुनबाई' येत्या २१ नोव्हेंबर २०२५ पासून संपूर्ण महाराष्ट्रात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. शिवाजी दोलताडे दिग्दर्शित आणि गोवर्धन दोलताडे, गार्गी निर्मित, कार्तिक दोलताडे पाटील सह निर्मित या सिनेमाच्या पहिल्या पोस्टरने प्रेक्षकांच्या उत्सुकतेला नवीन उंची दिली होती, तर आता मुख्य असलेलं रंगतदार पोस्टरही प्रेक्षकांसमोर आलय. विशेष आनंदाची बाब म्हणजे महाराष्ट्राचे लोकप्रिय नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पोस्टरचे अनावरण करण्यात आले, यावेळी लेखक , निर्माते गोवर्धन दोलताडे व अभिनेते रोहन पाटील उपस्थित होते.

## देशभरातील १५ साखर कारखान्यांमध्ये कंप्रेस्ड बायोगॅस प्लांट्स

**अहिल्यानगर : हॅलो प्रभात**

केंद्रीय गृहमंत्री व सहकार मंत्री अमित शाह यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव येथे देशातील पहिल्या सहकारी मल्टी-फीड कंप्रेस्ड बायोगॅस प्लांटचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी सांगितले की, देशभरातील १५ निवडक साखर कारखान्यांना याच मॉडेलवर बायोगॅस संयंत्र उभारण्यासाठी मोदी सरकारकडून आवश्यक सहकार्य दिले जाईल. शाह म्हणाले की, या उपक्रमामुळे देशाच्या ऊर्जा क्षेत्राला नवी



दिशा मिळेल तसेच शेतकरी आणि ग्रामीण उद्योगांसाठी नव्या संधी निर्माण होतील. देशाच्या ऊर्जा स्वावलंबनाच्या दृष्टिकोनातून हा प्रकल्प महत्त्वाचा ठरतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या सहकार मंत्रालयाची स्थापना केली आणि त्याची जबाबदारी अमित शाह यांच्याकडे सोपवली. केवळ तीन-चार वर्षांत शाह यांच्या धोरणांमुळे सहकार मंत्रालय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार बनले असून, जर्जर व दुर्लक्षित सहकारी क्षेत्राला आत्मनिर्भर भारताच्या समृद्धीच्या केंद्रामध्ये रूपांतरित केले आहे. अहिल्यानगरमधील हे प्लांट जैविक ऊर्जा क्षेत्रातील नवा मैलाचा दगड ठरेल. या प्लांटमुळे भारत आणि पोटॅशच्या आयातीवर अवलंबून राहणार नाही, तसेच

## स्वस्तात स्मार्टफोन,अमर्याद सुविधा जिओ भारत मोबाईलची दिवाळी ऑफर

**मुंबई : हॅलो प्रभात**




रिलायन्स जिओने 2 जी मुक्त भारत मोहिमे अंतर्गत महाराष्ट्रातील ग्राहकांना २जीवरून ४जीवर अपग्रेड करण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे. या दिवाळीत जिओ भारत मोबाइल फक्त ६९९ पासून उपलब्ध असून, कंपनीचे उद्दिष्ट राज्यातील १ कोटीहून अधिक २जी वापरकर्त्यांना ४जी तंत्रज्ञानाशी जोडणे आहे. याच्या १२३ च्या मासिक प्लानमध्ये १४ GB डेटा आणि अमर्याद कॉलिंगचा लाभ मिळतो. इतर कंपन्यांचे १९९ चे प्लान फक्त २ GB डेटा देतात, वार्षिक प्लानसाठीही ग्राहकांना फक्त १२३४ भरावे लागतात. जिओ भारत मोबाईल केवळ स्वस्त इंटरनेटपुरता मर्यादित नाही. यात जिओ हॉटस्टारचे सबस्क्रिप्शन, जिओ सावनवरील ८ कोटी गाणी, तसेच जिओ टीव्हीवरील ६००+ चॅनेल्स पाहण्याची सुविधा मिळते. त्यासोबतच जिओ पेच्या माध्यमातून सोपे णझख व्यवहार करता येतात, आणि व्यापाऱ्यांसाठी मोफत पे साउंड बॉक्सही देण्यात येत आहे.

## मंजिरीचा डाव फसला मीरा अंबिकाची भावनिक भेट !

**मुंबई : हॅलो प्रभात**



'तुला जपणार आहे' या लोकप्रिय मालिकेत आता प्रेक्षकांना नाट्यमय आणि भावनिक वळणाचा अनुभव मिळणार आहे. मंजिरीने अथर्व आणि मीराच्या नात्यात जवळीक निर्माण व्हावी म्हणून देवीचा पारंपरिक गोंधळ आयोजित केला आहे. मात्र, तिच्या मनात काही वेगळाच डाव सुरू असून, मीराला घराबाहेर जाऊ न देण्यासाठी आणि अंबिकाला कैदेत ठेवण्यासाठी ती काळी जादू वापरण्याच्या तयारीत आहे.गोंधळाच्या निमित्ताने आखलेल्या 'लक्ष्मणरेषे'मुळे मीरा घराबाहेर पडू शकत नाही, पण देवी आजी प्रकट होऊन तिला धैर्य आणि कर्तव्याची जाणीव करून देते. देवी आजीच्या आशीर्वादाने मीरा भीतीवर मात करून पुढे जाण्याचा निर्णय घेते. या प्रसंगातून बहिणींच्या गूढ नात्याचा आणि सत्य-असत्याच्या संघर्षाचा उलगडा होणार आहे. मंजिरीचा डाव पुन्हा फसणार असून, मीराच्या दृढ विश्वासामुळे सत्याचा विजय ठरणार आहे.

## १० ऑक्टोबरला प्रदर्शित होणार 'सकाळ तर होऊ द्या'

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**



मराठी चित्रपटसृष्टीत एक ताजेतवाने जोडपं प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. बहुप्रतिक्षित 'सकाळ तर होऊ द्या' हा चित्रपट येत्या १० ऑक्टोबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. बहुरंगी भूमिकांनी रसिकांची मनं जिंकणारा अभिनेता सुबोध भावे या चित्रपटात एका नव्या, अनोख्या रूपात दिसणार आहे. त्याच्या जोडीला प्रथमच मानसी नाईक झळकणार असल्याने प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. चित्रपटाची निर्मिती निर्मात्या नम्रता सिन्हा यांनी केली असून, समिट स्टुडिओज आणि मधु शर्मा प्रस्तुतकर्त्या आहेत. या चित्रपटाद्वारे दिग्दर्शक आलोक जैन मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करत आहेत. चित्रपटातील संगीत विशेष आकर्षण ठरत आहे. 'नाच मोरा नाच...' हे गाणे अल्पावधीतच लोकप्रिय झाले असून, 'सकाळ तर होऊ द्या...' या शीर्षकगीतासह 'जगू दे मला...' या अर्थपूर्ण गीतांनाही रसिकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

## एमएसएमईच्या विकासासाठी 'बझिंग फॉर भारत' उपक्रमाची सुरुवात

**मुंबई : हॅलो प्रभात**

भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या डिजिटल क्षमतांना बळकटी देत शाश्वत वाढ साध्य करण्यासाठी ईझबझने 'बझिंग फॉर भारत' या अभिनव व्यासपीठाची सुरुवात केली आहे. या उपक्रमाचा उद्देश एमएसएमई क्षेत्राला डिजिटायझेशन आणि जागतिक संधींच्या माध्यमातून अधिक सक्षम आणि स्पर्धात्मक बनवणे हा आहे. डिजिटल एक्सलन्स अवॉर्ड्स २०२५' सोहळ्याने मुंबईत 'बझिंग फॉर भारत' उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. सातत्यपूर्ण इकोसिस्टम म्हणून तयार करण्यात आलेला 'बझिंग फॉर भारत' उपक्रम मान्यता, प्रवेश आणि सक्षमीकरण या तीन प्रमुख स्तंभांद्वारे एमएसएमई क्षेत्राला दीर्घकालीन विकास आणि व्यवसायवृद्धीच्या दिशेने अधिक सक्षम बनवण्याचे उद्दिष्ट ठेवतो.

## ऑडी इंडियाचा अजिओ लक्ससोबत सहयोग

**मुंबई : हॅलो प्रभात**



ऑडी इंडियाने देशभरातील ग्राहक, उत्साही व ब्रँडशी निष्ठावान व्यक्तींकरिता ऑडी कलेक्शन आणण्यासाठी भारतातील आघाडीचा लक्झरी प्लॅटफॉर्म अजिओ लक्ससोबत सहयोग केला आहे. सणासुदीचा काळ सुरू असताना हे कलेक्शन महत्त्वाकांक्षी ग्राहकांना प्रीमियम जीवनशैली निवडींसह सण साजरे करण्याची संधी देते, ज्या ऑडीच्या प्रगतीशील डिझाइन तत्त्वांना दैनंदिन जीवनामध्ये आणतात. या कलेक्शनमध्ये ॲक्सेसरीज, प्रीमियम कलेक्टिबल्स व अचूकरित्या डिझाइन केलेल्या लघुचित्रांमधील ३०हून अधिक जीवनशैली उत्पादने आहेत, ज्यांच्यामध्ये ऑडीची प्रख्यात डिझाइन शैली आणि दैनंदिन आकर्षकतेचे संयोजन आहे. किंमत ३,००० पासून सुरू होण्यासह या श्रेणीमध्ये कार्यक्षमता-प्रेरित डिझाइन व कारागिरीचे मिश्रण आहे.

## मुंबईमध्ये २९ व्या फेअर कॉन्फरन्सला सुरूवात



**मुंबई : हॅलो प्रभात**

२९व्या फेडरेशन ऑफ आफ्रो-एशियन इन्शुरर्स अँड रिइन्शुरर्स (फेअर)ला काल जेडब्ल्यू मेरिएट, मुंबई सहार येथे अधिकृतरित्या सुरूवात झाली, जेथे भारतातील व जगभरातील ७०० हून अधिक प्रतिनिधी जागतिक विमा व पुनर्विमा उद्योगामधील सर्वात मोठ्या संमेलनासाठी एकत्र आले. जनरल इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (जीआयसी आरई)ने मुख्य थीम 'उदयोन्मुख बाजारपेठा - स्थिर विकासाच्या दिशेने वाटचाल'अंतर्गत या परिषदेचे आयोजन केले आहे.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय** : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क** : ९०२१६५१९७६ ■ **कोल्हापूर कार्यालय** : एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायक्षेत्र)
■ निवासी संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर



## थोडक्यात...

### निरोगी जीवनासाठी जनजागृती आणि सकारात्मक सवयींचा संकल्प



कोल्हापूर : हॅलो प्रभात

जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या वतीने नागरिकांच्या आरोग्य रक्षणासाठी जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' कार्यक्रमांतर्गत कर्करोग,मधुमेह, ॲनिमिया व उच्च रक्तदाब यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्या जात आहेत. यावेळी आरोग्य अधिकाऱ्यांनी निरोगी जीवनशैली, संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि वेळोवेळी वैद्यकीय तपासणीचे महत्त्व अधोरेखित केले.कर्करोग प्रतिबंधासाठी: तंबाखू व मद्यपान टाळा, नियमित तपासणी करा. मधुमेह नियंत्रणासाठी: व्यायाम व संतुलित आहार घ्या, वजन नियंत्रित ठेवा. ॲनिमिया प्रतिबंधासाठी: लोहयुक्त पदार्थांचे सेवन करा व आयएफए गोळ्या नियमित घ्या.उच्च रक्तदाबासाठी: मीठ कमी वापरा, धूम्रपान टाळा, रोज व्यायाम करा. असे प्रमुख आरोग्य सल्ले यावेळी देण्यात आले. अधिक माहितीसाठी नागरिकांनी आपल्या नजीकच्या शासकीय रुग्णालयाशी संपर्क साधावा, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध पिंपळे यांनी आवाहन केले आहे.

### 'मराठी भाषा : अभिजात पैलू' व्याख्यानमाला संपन्न




सांगली : हॅलो प्रभात

श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाच्या वतीने 'मराठी भाषा : अभिजात पैलू' या विषयावर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. विष्णू वासमकर यांनी प्रमुख व्याख्यान दिले. डॉ. वासमकर म्हणाले की, मराठी भाषेला अभिजाततेचा दर्जा सहजासहजी मिळालेला नाही. २०१२ साली प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली तयार झालेला अहवाल केंद्र सरकारकडे सादर करण्यात आला आणि जवळपास बारा वर्षांच्या पाठपुराव्यानंतर ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. मराठीला दोन हजार वर्षांचा लिखित इतिहास असून, नानेघाट शिलालेखापासून ते संत वाङ्मयापर्यंतची परंपरा तिच्या समृद्धतेचा पुरावा आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वुइमेन्स एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा डॉ. लतताई देशपांडे होत्या. त्यांनी अभिजात दर्जा हा अभिमानाचा विषय असल्याचे सांगून मराठी भाषेच्या जतन आणि संवर्धनासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. अनिल सुगते यांनी स्वागत व प्रस्ताविक केले. उपप्राचार्या आणि मराठी विभाग प्रमुख डॉ. नंदिनी काळे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. रोहिणी देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रदर्शन डॉ. संदीप दळवी यांनी केले. या कार्यक्रमास २५० हून अधिक विद्यार्थिनी उपस्थित होत्या. वुइमेन्स एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन आणि प्राध्यापकवर्गाचे सहकार्य लाभले.

### हर्षवर्धन सावंत,सुरज शिंदेची मल्लखांब स्पर्धेसाठी निवड

पेठवडगाव : हॅलो प्रभात



येथील छत्रपती शिवाजी विद्यानिकेतन व ज्युनि. कॉलेज व दिशा इंग्लिश मेडियम स्कूल या प्रशालेच्या विद्यार्थ्यांची शालेय विभागीय मल्लखांब स्पर्धेसाठी निवड झाली. क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,कोल्हापूर यांच्या वतीने शिरोळ येथे घेण्यात आलेल्या शालेय जिल्हास्तरीय मल्लखांब स्पर्धेत प्रशालेच्या हर्षवर्धन सावंत याने १४ वर्षाखालील गटात व सुरज शिंदे याने १९ वर्षाखालील गटात प्रथम क्रमांक मिळवला.दोन्ही यशस्वी विद्यार्थ्यांची सांगली येथे होणाऱ्या शालेय विभागीय मल्लखांब स्पर्धेसाठी निवड झाली. या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशालेचे संस्थापक अध्यक्ष व मुख्याध्यापक राजेंद्र माने,संस्थेच्या सचिवा सुवर्णा माने,खजानिस बापूसो माने यांचे प्रोत्साहन व क्रीडा प्रशिक्षक सुजित पाटील,जिमखाना प्रमुख आनंद पाटील यांचे मार्गदर्शन लाभले तसेच मिलिटरी इन्स्ट्रक्टर मेजर राजेंद्र पाटील,कॅप्टन सुरेश आडसूळ,सर्व विभाग प्रमुख,शिक्षक,प्रशिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

### सरकारने जाहीर केलेली मदत अत्यंत तुटपुंजी

मुंबई : हॅलो प्रभात

अतिवृष्टी व पुराने राज्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे नुकसान झाले आहे, खरीप हंगाम तर पूर्ण वाया गेलाच आहे पण रब्बीचा हंगामही हाती लागणार नाही अशी अवस्था आहे. शेतीच्या नुकसानासोबत शेतकऱ्यांचे घर दार संसार उघड्यावर पडले आहेत परंतु भाजपा महायुती सरकारने मात्र नुकसान भरपाईच्या नावाने फसवणूक केली आहे. लाखोंचे नुकसान झाले असताना सरकारने जाहीर केलेली मदत ही अत्यंत तुटपुंजी असून उद्धवस्थ झालेल्या शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे, अशी टीका करून सरकारने सरसकट नुकसानग्रस्त शेतक-यांनाप्रतिहेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी व आश्वासन पाळून कर्जमाफी करावी अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

## व्यंकटेश्वरा आयटीआयमध्ये विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात

इस्लामपूर : हॅलो प्रभात

येथील व्यंकटेश्वरा शिक्षण संस्था, संचलित व्यंकटेश्वरा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये (आयटीआय) सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांमध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून घाटगे पाटील इंडस्ट्रीजचे असोसिएट व्हाईस प्रेसिडेंट फत्तेसिंह जाधव, व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष सम्राटबाबा महाडिक, कंपनीचे एचआर मॅनेजर विनायक भारती तसेच, संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ.महेश जोशी, व्यंकटेश्वरा आयटीआय चे प्राचार्य विनोद कापसे उपस्थित होते.





यावेळी बोलताना फत्तेसिंह जाधव म्हणाले की, आयटीआय ची मुले ही टेक्निकली स्ट्रॉग असतात तसेच त्यांच्याकडे कल्पक बुद्धीही असते त्या जोरावर विद्यार्थी चांगले यश मिळवू शकतो. चांगले कौशल्य व टेक्निकल नॉलेज असलेल्या आयटीआय विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध आहेत. या संधीचा विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. आयटीआय मध्ये राबवत असलेले उपक्रम व देत असलेल्या शिक्षणाबाबत त्यांनी कौतुक व्यक्त केले.

सम्राट महाडिक म्हणाले, आयटीआय चे शिक्षक विद्यार्थ्यांना फक्त ज्ञान नाही तर कौशल्य सुद्धा शिकवतील जेणेकरून विद्यार्थी आगामी काळात औद्योगिक क्षेत्रात आपली नवी ओळख निर्माण करू शकतील. त्यांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. महेश जोशी म्हणाले संस्थेमार्फत आयटीआय मध्ये अतिशय चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत त्या सुविधांचा विद्यार्थ्यांनी वापर करून आपल्या ज्ञानात भर पाडून नोकरी अथवा उद्योजक बनावे.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक आयटीआयचे प्राचार्य विनोद कापसे यांनी केले. यावेळी ज्यु. कॉलेजचे प्राचार्य श्री. विकास पाटील, महालक्ष्मी आयटीआयचे प्राचार्य आदर्श पाटील तसेच आयटीआय मधील निदेशक निलेश पाटील,अमीर जमादार,माणिक कांबळे, संतोष पाटील, नामदेव कांबळे, शिवाजी फोंडे, संतोष नलावडे,अजय गाडे, वैभव पाटील, मयूर आवळे, इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.चंद्रकांत गावडे यांनी केले.

## संजीवनमध्ये अटल ऑनलाइन एफडीपीचे आयोजन

पन्हाळा : हॅलो प्रभात

येथील संजीवन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स व एआयसीटीई यांच्या सहकार्याने कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनीअरींग विभागात "-I-Driven Technologies for Innovation, Research, Education, Healthcare and Business -pplications' या विषयावर सहा दिवसीय अटल ऑनलाइन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचे आयोजन ६ ते ११ ऑक्टोबर दरम्यान होणार आहे.या उपक्रमासाठी एआयसीटीईकडून एक लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. कार्यक्रमात कृत्रिम बुद्धिमत्तेचा विविध क्षेत्रातील उपयोग प्रत्यक्ष उदाहरणांसह मांडला जाणार आहे. या आयोजनासाठी चेअरमन पी.आर.भोसले, सहसचिव एन.आर. भोसले, प्राचार्य डॉ. संजीव जैन यांचे मार्गदर्शन लाभले असून समन्वयक म्हणून प्रा. राहुल नेजकर व प्रा. प्रवीण अतिग्रे काम पाहणार आहेत.

## नव कृष्णा व्हॅली स्कूलची श्रीनिधी भोसले बुद्धिबळमध्ये प्रथम

सांगली : हॅलो प्रभात

सांगली जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने दि. ५ ऑक्टोबर २०२५ रोजी तक्ष्यशीला स्कूल, सांगली येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत -१४ वर्षाखालील वयोगटात नव कृष्णा व्हॅली स्कूल (इंग्रजी माध्यम) ची विद्यार्थीनी श्रीनिधी भोसले हिने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला.

या उल्लेखनीय यशामुळे श्रीनिधी भोसले हिची पुढील शालेय विभागीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी सातारा येथे निवड झाली आहे. तिच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक प्रवीणजी लुंकड, अध्यक्ष सुरज फाउंडेशनचे, संगिता पागनीस, डायरेक्टर



सुरज फाउंडेशन,प्रशांत चव्हाण उपप्राचार्य नव कृष्णा व्हॅली स्कूल इंग्रजी माध्यम), विनायक जोशी स्पोर्ट्स इन्चार्ज, सुशांत सूर्यवंशी क्रीडा शिक्षक तसेच बुद्धिबळ प्रशिक्षक अरुणा कुलकर्णी यांच्या प्रोत्साहन व मार्गदर्शनाचा श्रीनिधीला लाभ झाला. श्रीनिधीच्या या विजयामुळे शाळेत तसेच क्रीडा क्षेत्रात तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## शासनाने पूरग्रस्तांना दुग्ध व्यवसायासाठी पशुधन द्यावे

### योगेश जाधव यांची मागणी

कुर्डुवाडी : अंकुश आतकर

माढा व करमाळा तालुक्यातील सिना नदीच्या काठावर असलेल्या गांवात अतिवृष्टी मुळे निर्माण झालेल्या पुरस्थितीत कारण शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पशुधन गणना करून शेतकऱ्यांना पंचायत समितीच्या पशुवैद्यकीय व कृषी विभागाच्या माध्यमातून प्रत्येकी एक दुभते जनावर देण्यात यावे अशी मागणी शिवसेना शिंदे गटाचे शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष योगेश जाधव यांनी केली आहे.



येथील उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात अतिवृष्टी मुळे आलेल्या भीषण पुरात शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या पशुपालकांचे पशुधन वाहून गेले किंवा मृत झाले. अशा आसमानी संकटामुळे शेतीबरोबरच जोडधंदा असलेल्या दूध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.समाजातील अनेक सेवाभावी संस्था मदत करत आहेत परंतु माढा व करमाळा तालुक्यातील सीना काठावरील शेतकऱ्यांच्या वाहून गेलेल्या किंवा पुराच्या पाण्यात मृत पावलेल्या पशुधनाच्या बाबतीत पंचायत समितीने पुढे येऊन झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून त्यांना यांना शासनाच्या योजनेत असलेल्या पशु संवर्धन विभागाकडून शासना मार्फत पूर्ण अनुदानित पशुधन तात्काळ देण्यात यावी.असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी सुनील देवकर,धनेश भगत, आबासाहेब आलदरआदी शेतकरी बांधव उपस्थित होते.

## अभयसिंह ऐवळे कराटे स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम

नातेपुते : हॅलो प्रभात

क्रीडा व युवक संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे विभाग अंतर्गत सोलापूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व क्रीडा परिषद सोलापूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शालेय क्रीडा स्पर्धेत सांगोला येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत सिंहगड पब्लिक स्कूल कमलापुर चा विद्यार्थी अभय सिंह दीपक ऐवळे याने प्रथम क्रमांक मिळवून गोल्ड मेडल प्राप्त केले. या स्पर्धेसाठी सोलापूर जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यातील संघ, शाळा, विद्यालय यांनी



सहभाग नोंदवला. या क्रीडा स्पर्धेचे रेफ्री म्हणून राष्ट्रीय पंच निजेंद्र चौधरी होते, तर अभयसिंह दीपक अहिवळे यांना न्यू इंग्लिश स्कूल सांगोला येथे वाघमारे कराटे क्लासेसचे प्रशिक्षण देणारे सुनील वाघमारे, गौतम वाघमारे, श्रावणी वाघमारे व निजेन्द्र चौधरी यांच्याकडून प्रशिक्षण मिळाले. सिंहगड पब्लिक स्कूल कमलापूरचे क्रीडा शिक्षक गणेश पवार यांचे मार्गदर्शन मिळाले. पुढे विभागीय स्तरावर निवड करण्यात आली असून त्याच्या या यशाबद्दल सांगोला तालुक्यातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## श्री ज्ञानेश्वरी सेवा संस्थेच्या अध्यक्षपदी देवता मस्कर

### उपाध्यक्षपदी अंजली चौगले

करवीर : हॅलो प्रभात

श्री ज्ञानेश्वरी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्थेच्या नुतन सभापती व उपसभापती निवडीची सभा श्री.पोवार, सहा. निबंधक, करवीर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली.संस्थेच्या ८० वर्षांच्या इतिहासात प्रथमच सभापती म्हणून सौ.देवता मस्कर आणि उपसभापती म्हणून सौ. अंजनी चौगले यांची एकमताने निवड करण्यात आली.





सभेत संस्थेचे संचालक प्रकाश चौगले, विष्णु पाटील, पंडीत मस्कर, कृष्णात चौगले, बाबासो पाटील, भाऊसो पाटील, दिपश्री पाटील, विजया पाटील, अनिता पाटील, आनंदा पाटील, संजय भक्कर, दिपक पाटील, धिरज पाटील उपस्थित होते.

यावेळी व्ही.बी.पाटील, रसिका पाटील तसेच युवा नेते अमर पाटील, कॅप्टन उत्तम पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. नेते मंडळींनी महिलांना संधी दिल्याबद्दल सभासद महिलांनी गुलालाची उधळण करून आनंद साजरा केला.

## 'आयकॉनेंट २०२५' परिषद यशस्वीरित्या संपन्न

### आरआयटीने गोव्यात केले होते आयोजन

इस्लामपूर : हॅलो प्रभात

आरआयटी च्या माहिती तंत्रज्ञान विभागाने गोव्यातील इंटरनॅशनल सेंटर येथे चौथी आंतरराष्ट्रीय परिषद 'ॲडव्हान्समेंट इन टेक्नॉलॉजी', 'आयकॉनेंट २०२५' यशस्वीरित्या आयोजित केली. या परिषदेचे तांत्रिक सह-आयोजनआय.ई.ई.ई बॉम्बे सेक्शनने केले होते.

या परिषदेला अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. यामध्ये फ्रान्सच्या भारतातील वाणिज्य दूतावासातील वैज्ञानिक आणि उच्च शिक्षण विभागाचे संलग्न अधिकारी फिलीप मॉरीन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर नेताजी सुभाष युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजीच्या संचालिका आणि आयईईई इंडिया कौन्सिलच्या अध्यक्षा डॉ.प्रेरणा गौर या अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

या व्यतिरिक्त, आयईईई बॉम्बे सेक्शनचे प्रतिनिधी डॉ.सी.के. झा. तसेच अनेक आंतरराष्ट्रीय पाहुणे आणि विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते. या परिषदेला युनिव्हर्सिटी ऑफ साउथ





कॅरोलिना अपस्टेटचे असोसिएट प्रोफेसर डॉ. अलेक्झांडर लॉरेन्झ, जॉर्ज डीन जॉन्सन, जूनियर कॉलेज ऑफ बिझनेस अँड इकॉनॉमिक्स चे अधिष्ठाता डॉ. जेफ्री स्टिन्सन, आणि पेरिस-क्ब्वन येथील अवियनसिटी स्कूल ऑफ एआय अँड डेटा फॉर बिजनेस अँड सोसायटी चे आंतरराष्ट्रीय संबंध प्रमुख श्री.लॉरेंट चेबासियर यांचीही उपस्थिती होती.

आरआयटीचे डायरेक्टर डॉ.पी.व्ही.कडोले यांनी सांगितले कि, आयकॉनेंट ही परिषद दरवर्षी आयोजित केली जाते आणि ती भारत तसेच परदेशातील संशोधकांसाठी त्यांचे संशोधन सादर करण्यासाठी, कल्पनांचे आदानप्रदान करण्यासाठी आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाबद्दल माहिती मिळवण्यासाठी एक प्रमुख व्यासपीठ प्रदान करते. आयकॉनेंट २०२५ साठी, भारतातील २० राज्ये आणि फिलिपिन्स, झिम्बाब्वे, ऑस्ट्रिया, इराक आणि दक्षिण आफ्रिका यांसह १७ देशांमधून ३.०२२ संशोधनपर निबंध सादर झाले. कठोर पुनरावलोकनानंतर, त्यापैकी ३१५ हून अधिक शोधनिबंध स्वीकारले गेले. सुमारे १२० शोधनिबंध प्रत्यक्ष सादर केले गेले, तर इतर अनेक ऑनलाइन सादर झाले या कार्यक्रमाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संशोधकांमध्ये व्यापक ज्ञान-आदानप्रदान आणि सहकार्याला प्रोत्साहन दिले. ज्यामुळे भविष्यातील तंत्रज्ञान आणि नवनवीन संशोधनासाठी नवीन दिशा निर्माण झाल्या.

माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ.अमोल सी.आडमुठे यांनी आयकॉनेंटचे निमंत्रक म्हणून काम पाहिले. याच विभागाचे सहायक प्राध्यापक एम.एन.मुल्ला यांनी या कार्यक्रमाचे प्रभावी समन्वय केले. आरआयटीचे संचालक डॉ.पी.व्ही.कडोले आणि कासेगाव एज्युकेशन सोसायटीचे सचिव प्रा.आर.डी.सावंत यांच्या मार्गदर्शन आणि मौल्यवान पाठिंब्यामुळे परिषदेचे यश सुनिश्चित झाले.

## कै.नामदेवराव नालंदे प्रतिष्ठानचे कार्य कौतुकास्पद : गणेश बिरादार

बारामती : हॅलो प्रभात

येथील ज्येष्ठ नागरिक संघ कै.नामदेवराव नालंदे यांच्या आठव्या स्मृतीदिनानिमित्त प्रतिष्ठान तर्फे बारामती व पंचक्रोशीतील पत्रकार बांधवांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी पोलीस उपयुक्त गणेश इंगळे,अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव तसेच दीपक वाबळे, माधव जोशी, पत्रकार बांधव व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.



यावेळी बोलताना योगेश नालंदे यांनी प्रतिष्ठानच्या कार्याबद्दल माहिती दिली. यानंतर बारामती मधील पत्रकार क्षेत्रातील मानाचा पुरस्कार समजला जाणारा कै नामदेवराव नालंदे जीवनगौरव पुरस्कार, मरणोत्तर कै द.रा. पवार यांना तसेच पळशी येथील पत्रकार काशिनाथ पिंगळे यांना देण्यात आला. यावेळी बोलताना गणेश इंगळे व गणेश बिरादार यांनी पत्रकार बांधवांना शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले. श्री.बिरादार म्हणाले की, डिजिटल काळातील पत्रकारितेमधील बदल स्वीकारून पत्रकारांनी अपडेट राहिले पाहिजे. बऱ्याच घटना या पत्रकारांच्या सतर्कतेमुळे उघड होतात. खरी पत्रकारिता करून हा लोकशाहीचा स्तंभ मजबूत करण्याचे काम पत्रकार बांधव करत आहेत. या कार्यक्रमासाठी नानासाहेब साळवे, प्रशांत नालंदे, मेघराज नालंदे, किरण हिवरे, प्रदीप ढुके व सहकाऱ्यांनी सहकार्य केले. चंदूकाका सराफ यांच्या वतीने कार्यक्रमासाठी ट्रॉफी सौजन्य दिले होते.

## दुर्गा मातेच्या मिरवणुकीत कलाकारांचे अघोरी नृत्य

येळावी : शुभम पाटील

येथील श्री दुर्गामाता नवरात्र उत्सव मंडळाच्या दुर्गा माता देवीचा विसर्जन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. विसर्जन मिरवणुकीतील अंगावर शहारे आणणारे भगवान शिव भोलेनाथांच्या गाण्यांवरती आपले कौशल्य सादर करत शिवतांडव, अग्नितांडव आणि अघोरी नृत्याचे नेत्रदीपक सादरीकरण करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. गावच्या मध्यवर्ती भागातून सुरू झालेल्या मिरवणुकीने अनेक भाविक भक्तांना या क्षणांचा आनंद घेता आला. दरम्यान गावातील मुख्य चौकात अगडबम बबम बम लहरीया गीतावर नृत्य पाहण्यासाठी गावातील भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

मंडळाने यावर्षी विविध सामाजिक उपक्रम,



महाआरती असे कार्यक्रम राबवून ९ दिवस भक्तिमय वातावरणात उत्सव साजरा केला. विसर्जन मिरवणुकीत अघोरी नृत्य सादर करून कलाकारांनी प्रेक्षकांची मने जिंकली. गावात प्रथमच अघोरी नृत्य सादर करणारे हे पहिलेच मंडळ ठरले. अघोरी कला दाखवणाऱ्या कलाकारांची कला पाहून नागरिकांनी कौतुक केले.अघोरी नृत्य पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

# संतांच्या विचारांत समाज बदलण्याचे सामर्थ्य

**प्रा.विद्यासागर वाघेरे**
**वाई : हॅलो प्रभात**

संतांनी केलेली सामाजिक कामगिरी उल्लेखनीय आहे. त्यामुळे समाजामध्ये सकारात्मक बदल घडून आले, असे प्रतिपादन महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी येथील सहयोगी प्राध्यापक प्रा. विद्यासागर वाघेरे यांनी केले. येथील जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयामध्ये अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत मराठी विभाग, वाङ्मय मंडळ व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या



'संत साहित्य व आजची सामाजिकता' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे होते. याप्रसंगी उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. चंद्रकांत कांबळे, वाङ्मय मंडळाचे समन्वयक डॉ. संग्राम थोरात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. शिवाजी कांबळे यांची उपस्थिती होती.

प्रा.वाघेरे म्हणाले, संतांनी मानवी स्वातंत्र्याचा आग्रह धरला होता. तेराव्या शतकात होऊन गेलेल्या संतांचे विचार आजच्या आधुनिक काळातही फार गरजेचे आहेत. संतांच्या नंतर छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी महापुरुषांचे समाजावर फार मोठे उपकार आहेत. त्यांच्याप्रती समाजाने कृतज्ञ राहावे. समाज बदलण्याचे सामर्थ्य ज्ञानेश्वरी व गाथा या ग्रंथांमध्ये असल्याने, प्रत्येकाच्या घरी हे ग्रंथ असलेच पाहिजेत.

प्रा.डॉ.ज्ञानदेव झांबरे मनोगत व्यक्त करताना म्हणाले, संतांनी केलेले सामाजिक कार्य पुढील महापुरुषांना प्रेरणादायी ठरले. संतांनी शिकविलेल्या समानतेच्या विचारांवर सर्वांनी चालण्याचा प्रयत्न करावा.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे यांनी संतांच्या कार्याचा आढावा घेऊन, त्यांचे समाज जीवनातील स्थान अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. चंद्रकांत कांबळे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. संग्राम थोरात यांनी करून दिला. डॉ. धनंजय निंबाळकर यांनी आभार मानले तर सूत्रसंचालन श्रीमती सुमती कांबळे व डॉ. अमोल कवडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भूगोल विभागप्रमुख प्रा.डॉ. विनोद वीर, पोलिस व सैन्य भारतीपूर्व प्रशिक्षणाचे प्रशिक्षक विशाल महांगडे, जितेंद्र चव्हाण यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रीपेड मीटर बसविणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

शहर आणि उपनगरांत वीज महावितरण कंपनीने अदानी गँगच्या माध्यमातून वीज ग्राहकांचा मानसिक छळ सुरू केला आहे. वीज ग्राहकांची कोणतीही तक्रार नसताना अदानी गँगकडून सरळ घरात घुसून जुने वीजमीटर काढून नवीन प्रीपेड वीजमीटर बसवले जात आहेत. त्यामुळे वीज महावितरण कंपनी, अदानी गँगवर फौजदारी गुन्हा दाखल करा, अन्यथा शंखध्वनी आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे.



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने माजी नगरसेवक शकिल सय्यद यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने तहसीलदार सचिन पाटील यांना निवेदन सादर केले. या निवेदनात म्हटले आहे की, वीज ग्राहकांची तक्रार नसताना हे प्रीपेड वीजमीटर का बसवले जात आहेत?

# शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालयात विविध कार्यक्रम

**नातेपुते : हॅलो प्रभात**

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालयात २२ ते २९ सप्टेंबर २०२५ दरम्यान उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या आठवड्यात भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या शिक्षणातील योगदानाचा स्मरण, विद्यार्थीप्रिय शिक्षक प्रा. बी. टी. निकम यांची निवड, कर्मवीर भाऊराव पाटील जयंती श्रद्धांजली, सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त ऑपरेशन सिंदूर शॉर्ट फिल्म प्रदर्शित करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त प्रा. डॉ. डी. एस. थोरात यांचे व्याख्यान झाले. पंडित दीन दयाळ उपाध्यक्ष यांची जयंती निमित्त एक दिन, एक घंटा, एक साथ स्वच्छता अभियान अंतर्गत महाविद्यालय परिसरात स्वच्छता व प्लास्टिक संकलन करण्यात आले. याबरोबरच जागतिक पर्यावरण व आरोग्य दिवस विषयावर प्रा. डॉ. सी. एम. साळुंखे यांचे व्याख्यान झाले.

युनेस्कोच्या यादीतील छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गड किल्ल्यांची माहिती प्रा. डी. एस. थोरात यांनी दिली व पोस्टर प्रेझेंटेशन केले. शहीद भगतसिंग जयंतीनिमित्त प्रा. तेलसंग एच. बी. यांनी विचार मांडले. स्वच्छ नारी सशक्त परिवार अंतर्गत ग्रामीण रूग्णालयाच्या सहकार्याने मुलींची रक्त तपासणी करण्यात आली. महात्मा गांधी जयंतीनिमित्त प्रा. एम. बी. सावंत यांचे व्याख्यान झाले.सर्व कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महाविद्यालयाच्या अध्यक्षा पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य डॉ. बाळासाहेब निकम यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीपणे पार पडले. एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. जगदीशचंद्र मुळीक, प्रा. उत्तम सावंत, प्रा. डॉ. सुनिता सूर्यवंशी, प्रा.श्रीकांत पवार, डॉ. कमल कांबळे, सौ. मंगल पवार, कु.दिपाली मसुगडे, प्रा.रेडेकर, मुख्यलिपिक हनुमंत वाघमोडे, श्री. नागराज करपे सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, एन.एस.एस स्वयंसेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# अखेर इस्लामपूर नगरपालिकेने उचलला कचरा

## शिवसेना युवानेते अमीर हवलदार यांचा पाठपुरावा

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

येथील वाळवा फाटा येथे गेल्या तीन चार महिन्यांपासून नगरपालिकेतील काही कचरा गाडी इस्लामपूर वाळवा रोड येथे शहरातील कचरा डंपिंग करत होते. त्यामुळे वाळवा फाटा लगत कचऱ्याचा ढीग साठवून होता. त्यामुळे आसपासच्या परिसरात दुर्गंधी पसरली होती. कचऱ्याच्या मोठ्या ढीगामुळे भटकी कुत्र्यांचा वावर परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढला होता. वाळवा रोड वरून येणार जाणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. उरून व वाळवा गावातील नागरिकांकडून सदरचा कचरा तेथून हलवावा अशी मागणी सातत्याने होत होती. परंतु नगरपालिकेतील कर्मचारी याकडे कान डोळा





करत होती. त्यामुळे मोठ्या प्रमाणात कचऱ्याचा ढीग साठवून राहिला होता. लोकनियुक्त वाळवा गावचे सरपंच संदेश कांबळे यांच्या लक्षात ही बाब आल्यानंतर त्यांनी गौरव भाऊ नायकवडी युवाशक्तीचे व शिवसेना युवानेते अमीर हवलदार यांना दूरध्वनीवरून ही बाब लक्षात आणून दिली. तात्काळ घटनास्थळी शिवसैनिक अमीर हवलदार यांनी धाव घेतली. नागरिकांना होणाऱ्या त्रासाचा गांभीर्य बघता त्यांनी शिवसेना सांगली जिल्हा समन्वयक गौरव भाऊ नायकवडी यांना इस्लामपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी पृथ्वीराज पाटील यांना दूरध्वनी वरून सदरचा कचरा हलवा असे सांगितले. तात्काळ मुख्याधिकारी पृथ्वीराज पाटील यांनी सदरचा कचरा उचलण्याचे आदेश दिले. लगेच नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी सदरचा कचरा तत्काल उचलला. त्यामुळे त्या ठिकाणच्या परिसराला पुन्हा एकदा नवीन रूप आले. कचरा उचलल्यामुळे नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे. रोखठोक भूमिका असणारे शिवसेना युवानेते अमीर हवलदार यांनी केलेल्या पाठपुरावामुळे तीन चार महिन्यापासून पडलेला कचरा अखेर उचलला, त्यामुळे त नागरिकांकडून त्यांचे कौतुक होत आहे.

# कोजागिरीच्या चंद्राच्या साक्षीने 'आकाश दर्शन'



**डॉ.मिलिंद हुजरे**
**तासगाव : हॅलो प्रभात**

आकाश दर्शन म्हणजेच चंद्र, ग्रह, तारे आणि इतर आकाशीय वस्तूंचे निरीक्षण करणे हे केवळ एक आकर्षक दृश्यानुभव नसून ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी क्रियाकलाप आहे. कोजागिरीच्या चंद्राच्या साक्षीने 'आकाश दर्शन' करणे व त्याचे महत्व जाणून घ्यावे असे उद्गार प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव येथे अंतर्गत गुणवत्ता आणि कक्ष व सांस्कृतिक विभागाच्या वतीने कोजागिरी पौर्णिमेनिमित्त 'आकाश दर्शन' या आगळ्या-वेगळ्या कार्यक्रमात बोलताना काढले. महाविद्यालयातील गुरुदेव कार्यकर्त्यांना, विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात दुर्बिणीतून चंद्र, ग्रह आणि ताऱ्यांचे निरीक्षण करत खगोलशास्त्राच्या अद्भुत जगाची अनुभूती घेतली.

विद्यार्थ्यांना विज्ञानविषयक जिज्ञासा जोपासण्याचे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने कराओके गीत गायन,संगीत खुर्ची, लगोरी यासारख्या खेळांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. प्रास्ताविक नॅक समन्वयक डॉ. जीवन घोडके यांनी केले तर आभार डॉ.शहाजी पाटील यांनी मानले.

# भाजपच्या नमो नेत्र संजीवनी अभियानास प्रतिसाद

**कवठेमहंकाळ : हॅलो प्रभात**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा याउपक्रमाअंतर्गत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून नमो नेत्र संजीवनी अभियान अंतर्गत मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर कवठेमहंकाळ तालुका भाजपा वतीने तालुक्यातील रांजणी,अगळगाव,ढालगाव,देशिंग या गावात घेण्यात आले.याचा लाभ बहुसंख्येने रुग्णांनी घेतला.

सदर शिबिरात नागरिकांची मोफत नेत्र तपासणी करून मोफत चष्मे वाटप करण्यात आले. तसेच ज्या रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेची गरज होती त्यांना मंगळवार दिनांक ३० सप्टेंबर रोजी मिरज येथील शासकीय रुग्णालयात शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले.



या उपक्रमाच्या माध्यमातून केवळ डोळ्यांचीच काळजी नाही तर समाजाबद्दलची आपली जबाबदारी ही अधोरेखित झाली.समाजाचेही काही देणं असते,आणि हाच खरा कृतज्ञतेचा मार्ग आहे आणि हीच खरी सामाजिक बांधिलकी आहे.तसेच हीच शिकवण सेवा पंधरवड्याचं हे औचित्य आपल्याला देऊन जाते,असे मत पत्रकारांशी बोलताना भाजपा तालुका अध्यक्ष उदयराजे भोसले यांनी व्यक्त केले.

यावेळी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस अनिल लोंढे म्हणाले की,पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या कार्यशैलीत समाजसेवेला विशेष महत्त्व आहे.त्याच धर्तीवर सेवा पंधरवड्यातून प्रत्येक घटकापर्यंत सेवा पोहोचविण्याचा आमचा संकल्प आहे.

याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय युवानेते दशरथ जाधव,जिल्हा कार्यकारणी सदस्य धनंजय शिंदे,युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अभिजीत शिंदे,तालुका कार्यकारणी सदस्य विजय सूर्यवंशी,सोशल मीडिया संयोजक सचिन भोसले, तालुका चिटणीस सचिन गायकवाड,विशाल भोसले, नितेश जाधव,डॉ. संदीप सूर्यवंशी,डॉ.काजल सावंत, नर्सिंग ऑफिसर सोनू नागरगोजे,निखिल देशमुखे,गोपाळ पाचफुले,वाहन चालक तातोबा मासाळ तसेच इतर वैद्यकीय अधिकारी,कमचारी आणि भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'शिक्षक मतदार संघ' संभाव्य उमेदवार म्हणून 'कौस्तुभ गावडे' चर्चेत

**ना.पाटील यांच्या सूतोवाचानंतर राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण**

**जत : हॅलो प्रभात**

पुणे शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसंदर्भात राजकीय वातावरण तापू लागले आहे. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी 'श्री विवेकानंद शिक्षण संस्था' चे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे हे शिक्षक मतदारसंघातील संभाव्य उमेदवार असू शकतात, असे सूतोवाच केल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.



विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सर्वसाधारण सभेमध्ये मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आपल्या भाषणात ही शक्यता व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे हे पुणे शिक्षक मतदारसंघातून संभाव्य उमेदवार असतील. त्यांच्या या वक्तव्यानंतर उपस्थित शिक्षक, कर्मचारी आणि पदाधिकारी यांच्यात उत्सुकता निर्माण झाली. मंत्री पाटील यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय निर्माण झाला आहे. शिक्षक मतदारसंघात शिवसेना (शिंदे गट) आधीच दावा सांगत असताना, भाजपकडून कौस्तुभ गावडे यांच्या संभाव्य उमेदवारीच्या चर्चेला वेग आला आहे. अनेकांच्या मते, पाटील यांच्या वक्तव्यातून आगामी निवडणुकीसाठी पक्षाची चाचपणी सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत.

# उच्चांकी अंतिम दूध दरफरक देणारा 'गोकुळ'दूध संघ एकमेव

**डॉ.योगेश गोडबोले**
**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. (गोकुळ) हा दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचा विचार करून पारदर्शक पद्धतीने काम करणारा राज्यातील अग्रगण्य सहकारी दूध संघ आहे. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात व्यापारी नफा २१५ कोटी ८७ लाख इतका झाला असल्याने गोकुळने देशातील सर्वाधिक म्हणजेच तब्बल १३६ कोटी रुपये अंतिम दूध दरफरक म्हणून वितरित करून देशातील क्रमांक एकचा दूध संघ म्हणून ओळख मिळवली आहे, अशी माहिती गोकुळचे कार्यकारी संचालक डॉ.योगेश गोडबोले यांनी दिली.



'गोकुळ'ची डिबेंचर योजना ही कोणतीही नवीन योजना नसून, सन १९९३ पासून म्हणजेच मागील ३२ वर्षांपासून सतत राबविली जात आहे. या योजनेची अंमलबजावणी करताना संघाने सल्लागारांचे मार्गदर्शन घेऊन सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्या आहे. दरवर्षी ३१ मार्च रोजी ताळेबंद नफा तोटा पत्रक तयार करून तो वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीसाठी ठेवला जातो. सन २०२४-२५ चा ताळेबंद वार्षिक सर्वसाधारण सभेत एकमताने मंजूर झाला असून, त्याची अंमलबजावणी करणे हे बंधनकारक आहे.

'गोकुळ'ने आजपर्यंत कोणत्याही दूध संस्थेची ४० टक्के डिबेंचर कपात केलेली नाही. संघाकडून १९९३ पासूनच संस्थांना डिबेंचर्स दिले जात असून, संस्था सक्षमीकरण आणि आर्थिक स्थैर्यासाठी ही योजना राबविली जाते. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये संस्थांना प्रति लिटर सरासरी रु. १.२५ प्रमाणे डिबेंचर्स दिले आहेत. डिबेंचर्स व दर फरकाची सर्व माहिती ७ ऑगस्ट २०२५ रोजीच्या खातेउताऱ्यातून संस्थांना देण्यात आली आहे. डिबेंचर्स स्वरूपात निधी उभारण्यासाठी संघाने वार्षिक सर्वसाधारण सभेची तसेच शासनाची मंजुरी घेतली आहे. ३१ मार्च २०२५ अखेर गोकुळने रु. १४४ कोटी १६ लाख २६ हजार ५०० इतकी रक्कम डिबेंचर्स स्वरूपात उभारली असून, त्यापैकी रु. ७२ कोटी ७८ लाख ४ हजार ३८८ इतकी रक्कम २०२४-२५ च्या अंतिम दरफरकातून संस्थांना देण्यात आली आहे. ही रक्कम भविष्यात संस्थांच्या वसूल भागभांडवलामध्ये रूपांतरित होणार आहे.

# राजे रामराव महाविद्यालयात शारदीय नवरात्रोत्सव उत्साहात

**जत : हॅलो प्रभात**

राजे रामराव महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग, महिला सबलीकरण कक्ष व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने शारदीय नवरात्रोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. नवरात्रोत्सवानिमित्त हळदी-कुंकू, पारंपरिक खेळ व नृत्यांचे आकर्षक आयोजन करण्यात आले होते.या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. संजीवनी माने-पाटील उपस्थित होत्या, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. सुरेश पाटील होते. उपप्राचार्य प्रा. एम.एच. करेनवर, सौ. सरिता सज्जन व सौ. पुजारी यांचीही यावेळी उपस्थिती होती.



यावेळी विद्यार्थिनींनी सादर केलेली विविध पारंपरिक नृत्ये व खेळ हा कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण ठरला. सादरीकरणातील लय, ताल व सांस्कृतिक रंगत यामुळे उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. विद्यार्थिनींच्या सहभागासोबतच विद्यार्थ्यांचाही उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला.हळदी-कुंकू या पारंपरिक उपक्रमातून स्त्रीशक्तीच्या एकत्रीकरणाचा संदेश देण्यात आला. तसेच नृत्ये व खेळांमधून परंपरा व आधुनिकतेचा सुंदर संगम साकारला गेला. सांस्कृतिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासह महिला सबलीकरणाला चालना मिळत असल्याचे उपस्थितांनी व्यक्त केले.

प्रमुख पाहुण्या प्रा. संजीवनी माने-पाटील यांनी विद्यार्थिनींच्या कलागुणांचे कौतुक करत परंपरेसोबत सांस्कृतिक मूल्ये जोपासण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य प्रा. डॉ. सुरेश पाटील यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होत असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागाच्या सदस्य प्रा. रेश्मा लवटे यांनी केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. सतीशकुमार पडोळकर यांनी केले, तर आभारप्रदर्शन प्रा. रोहिणी शिंदे यांनी मानले. शेवटी उपस्थित पाहुणे, प्राध्यापकवर्ग व विद्यार्थी यांचे आभार मानून शारदीय नवरात्रोत्सव सोहळ्याची सांगता करण्यात आली.

## सार्वजनिक विद्यापीठातील अध्यापकांच्या भरती प्रक्रियेस मान्यता : मंत्री चंद्रकांत पाटील

### अधिक पारदर्शकता आणण्यासाठी कार्यपद्धती निश्चित

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यातील सार्वजनिक अकृषि विद्यापीठांमधील अध्यापकांची निवड प्रक्रिया अधिक पारदर्शक, निपक्ष आणि संतुलित व्हावी, यासाठी कुलपती तथा राज्यपाल कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या निर्देशांनुसार कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. या कार्यपद्धतीनुसार विद्यापीठातील अध्यापकांच्या भरती प्रक्रियेस मान्यता देण्यात येत आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.



उच्च शिक्षण संस्थांमधील अध्यापकांकरिता विद्यापीठ अनुदान आयोगाकडून शैक्षणिक अर्हता आणि अनुषंगिक बाबी विहित करण्यात येतात. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून १८ जुलै २०१८ च्या अधिसूचनेनुसार विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील अध्यापकांच्या नियुक्तीसाठी आवश्यक किमान अर्हता आणि उच्च शिक्षणातील दर्जा कायम ठेवण्यासाठीच्या आवश्यक उपाययोजना आणि कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. या अधिसूचनेतील तरतुदी राज्यात लागू करण्यात आल्या आहेत. २८ फेब्रुवारी २०२५ च्या शासन निर्णयानुसार अध्यापकांची निवड प्रक्रिया राबविण्याबाबत कार्यपद्धती विहित करण्यात आली होती. ही निवड प्रक्रिया अधिक पारदर्शक, निष्पक्ष आणि संतुलित व्हावी यासाठी त्यात सुधारणा करण्यात आली आहे.सार्वजनिक अकृषि विद्यापीठांमधील सध्या सुरू असलेल्या अध्यापक व सांविधिक पदांच्या निवड प्रक्रिया नव्या कार्यपद्धतीनुसार पूर्ण करण्यात येणार असून भविष्यात होणाऱ्या सर्व भरती प्रक्रियेसाठी याच कार्यपद्धतीचा अवलंब करणे बंधनकारक असणार आहे, असेही मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

# राज्यात गुंतवणुकीच्या अमर्याद संधी

## मुख्यमंत्री; 'महाराष्ट्र' देशाचे गुंतवणुक मॅग्नेट

**मुंबई : हॅलो प्रभात**

राज्यात पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणात विकास करण्यात येत आहे. नवीन उद्योग सहज व कमी कालावधीत सुरू करण्यासाठी केलेल्या धोरणात्मक सुधारणांची अंमलबजावणी सुरू आहे. शासनाच्या या सर्व प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात गुंतवणुकीच्या अमर्याद संधी आहेत. त्यामुळे गुंतवणूकदारांनी अधिकाधिक गुंतवणुक राज्यात करावी, असे आवाहन करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र हे देशातील गुंतवणुकीचे 'मॅग्नेट' ठरल्याचे सांगितले. सह्याद्री अतिथीगृह येथे २०- २० गुंतवणूक संघटना शिष्टमंडळासोबत बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या बैठकीस उद्योग मंत्री उदय सामंत, उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक, २०-२० गुंतवणूक संघटनेचे अध्यक्ष वेरा ट्रोजन उपस्थित होत्या.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, धोरणात्मक सुधारणा, पायाभूत सुविधांचा होत असलेला विकास यामुळे महाराष्ट्र हे देशाचे 'ग्रोथ सेंटर' बनले आहे. देशाच्या एकूण डेटा क्षमतेपैकी ६० टक्के डेटा क्षमता महाराष्ट्रात आहे. मुंबई ही देशाच्या आर्थिक राजधानीसोबतच मनोरंजन, स्टार्टअपचीसुद्धा राजधानी आहे.

राज्यात दर्जेदार शिक्षण देण्यावर शासनाचा भर आहे. संपूर्ण राज्यात एक लाखपेक्षा जास्त शाळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यात येत आहे.

केंद्र शासनाने २०२० मध्ये नवीन शैक्षणिक धोरण आणले आहे. भविष्यातील आव्हाने, नवीन तंत्रज्ञान, जगासोबत असलेल्या स्पर्धेत पुढे जाण्यासाठी क्षमता निर्मिती या सर्व बाबींचा विचार करून नवीन शैक्षणिक धोरण आणण्यात आले आहे.

राज्य शासनाने केंब्रिज विद्यापीठासोबत शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी करारही केला आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

बैठकीस मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ संजय मुखर्जी, प्रधान सचिव (नियोजन) सौरभ विजय, सचिव (उद्योग) पी. अनबळगण, सचिव (पर्यावरण) जयश्री भोज, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासु आदी उपस्थित होते.

# १९ जिल्ह्यात राबविणार दुग्धविकास प्रकल्प

### मंत्री नितीन गडकरी व मंत्री पंकजा मुंडे यांच्यात बैठक

### शेतकऱ्यांना दूध संकलन व चारा लागवडीसाठी प्रोत्साहन

**मुंबई : हॅलो प्रभात**

नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डद्वारा मदर डेअरीच्या सहकार्यातून विदर्भातील ११ आणि मराठवाड्यातील ८ जिल्ह्यामध्ये दुग्धविकास प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबविण्यात येणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितिन गडकरी आणि राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्यात नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत यावर निर्णय घेण्यात आला. शेतकऱ्यांना दूध संकलन व चारा लागवडीसाठी प्रोत्साहन देण्यावर बैठकीत भर देण्यात आला.



विदर्भ आणि मराठवाड्यात नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डद्वारा मदर डेअरीच्या सहकार्याने बुटीबोरी, नागपूर व इतर ठिकाणी राबविण्यात येणाऱ्या दुग्धविकास प्रकल्पाच्या अनुषंगाने केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या समवेत नवी दिल्लीत बैठक झाली. राज्याचे पशुसंवर्धन सचिव एन. रामास्वामी, आयुक्त प्रवीणकुमार देवरे, एनडीडीबीचे चेअरमन डॉ. शहा, विदर्भ-मराठवाडा दुग्ध प्रकल्पाचे संचालक डॉ. बोरानी व डॉ. श्रीधर आदी यावेळी उपस्थित होते. विदर्भ आणि मराठवाड्यातील दुग्धविकास क्षेत्रात उपलब्ध असलेल्या ज्यादा दुधाचे संकलन करणे, दुग्धविकास, दुधाळ जनावरांची संख्या वाढविणे, या माध्यमातून या भागातील स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देणे व शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देणे हा या प्रकल्प राबविण्यामागे शासनाचा उद्देश आहे. प्रकल्पाचा पहिला टप्पा यापूर्वी विदर्भ आणि मराठवाड्यातील ११ जिल्हयात राबविण्यात आला होता. आता दुसर्या टप्प्यात विदर्भातील ११ व मराठवाड्यातील ८ जिल्ह्याचा समावेश करण्यात आला आहे. सर्व १९ जिल्हयात दूध संकलनाचा ॲक्शन प्लॅन तयार करण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. या प्रकल्पांतर्गत उच्च दूध उत्पादन क्षमता असलेल्या गाई, म्हशींचे शेतकरी पशुपालकांना वाटप करण्यात येणार आहे. पशु प्रजनन पूरक खाद्याचा पुरवठा, दुधातील फॅट व एसएनएफ वर्धक खाद्यपूर्वकांचा पुरवठा करण्यात येणार आहे. बहुवार्षिक चारा पिके घेण्यासाठी विशेष अनुदान वाटप, विद्युत चलित कडबाकुट्टी सयंत्रांचे वाटप, मुरघास वाटप तसेच आधुनिक पद्धतीने दूध व्यवसाय करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

**बीड जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीच्या नुकसानीनंतर करावयाच्या उपाययोजना तसेच विविध विकास कामांच्या संदर्भात मंत्री पंकजा मुंडे यांनी या भेटीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना मागण्यांचे पत्र सादर केले. या पत्राला श्री. गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. दरम्यान सावरगांव घाट येथे नुकत्याच पार पडलेल्या दसरा मेळाव्याच्या अनुषंगाने पंकजा मुंडे यांनी नितीन गडकरी यांचा राष्ट्रसंत भगवान बाबा यांची मूर्ती भेट देऊन सत्कार केला.**

## ऑनलाईन सेवांना गती द्यावी : सहकारमंत्री पाटील

### मुंबई विभागाचा मंत्री पाटील यांनी घेतला आढावा

**मुंबई : हॅलो प्रभात**

सामान्य नागरिकांना सहकार विभागाशी संबंधित सेवा सहज आणि सुलभपणे उपलब्ध होण्यासाठी अधिकाधिक सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्याचे निर्देश सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिले. मल्होत्रा हाऊस येथे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई विभागाचा आढावा घेण्यात आला. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, प्रशासकीय काम काज ठरलेल्या वेळेत पूर्ण होणे अत्यावश्यक आहे. नागरिकांना वेळेत सेवा मिळाली पाहिजे, जेणेकरून त्यांना दिरंगाईमुळे हेलपाटे मारावे लागू नयेत, अनेक नागरिकांच्या विभागस्तरावरील तक्रारी थेट मंत्रालयात येत आहेत. आपल्या विभागातील कामकाजाचे कालबद्ध नियोजन करून नागरिकांच्या कामाला प्राधान्य द्यावे. ई-ऑफिस चा अधिकाधिक कामकाजात वापर करावा. त्यामुळे नागरिकांना वेळेत सेवा उपलब्ध होतील कामकाजात अधिक पारदर्शकता येईल. सर्व सहकारी संस्थांचे ऑडिट वेळेत झाले पाहिजे, असेही त्यांनी निर्देश दिले. या बैठकीत विभागातील रिक्त पदांची स्थिती, सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकास प्रकरणांवरील कार्यवाही, प्रलंबित तक्रारी व प्राप्त अर्ज, सहकार संवाद आणि आपले सरकार पोर्टलवरील तक्रारी, अवसायनातील नागरी सहकारी बँकांच्या कामकाजाचा आढावा, मानीव अभिहस्तांतरण आढावा, विभागीय सहनिबंधक यांच्याकडील प्रलंबित प्रकरणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीला विभागीय सहनिबंधक शहाजी पाटील, जिल्हा उपनिबंधक, नितीन काळे, किरण सोनवणे, आनंद कटके, राजेश लव्हेकर मुंबई विभागातील विविध प्रशासकीय अधिकाऱ्यांसह संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.



## महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेला वाढती पसंती

### गेल्या ३ महिन्यांत २ लाखांवर ग्राहकांचा सहभाग

**मुंबई : हॅलो प्रभात**

वीजबिलांच्या छापील कागदांचा वापर बंद करण्यासाठी महावितरणने सुरू केलेल्या 'गो-ग्रीन' योजनेला वीजग्राहकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. गेल्या तीन महिन्यांमध्ये तब्बल २ लाख ३ हजार ३४० वीजग्राहकांनी या योजनेत सहभाग घेतला आहे.



वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडून सोमवार (दि. ६) पर्यंत लघुदाब वर्गवारीतील पर्यावरणस्नेही ७ लाख ६ हजार ९२४ ग्राहक या योजनेत सहभागी झाले आहे व त्यांना ८ कोटी ४८ लाख ३० हजार ८८० रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

'गो-ग्रीन योजनेतील वीजग्राहकांचा वाढता प्रतिसाद सहभाग स्वागतार्ह आहे. त्यांना वीजबिल डिजिटल स्वरुपात पाठवले जात आहे. पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी वीजग्राहकांनी या योजनेत सहभागी व्हावे', असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले आहे.

#### तीन महिन्यांत २ लाखांवर ग्राहक

वीजग्राहकांसाठी ऐच्छिक असलेल्या गो-ग्रीन योजनेला राज्यात प्रतिसाद वाढत आहे. विशेष म्हणजे जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर या तीन महिन्यांमध्ये २ लाख ३ हजार ३४० ग्राहकांची या योजनेत भर पडली आहे. यात सर्वाधिक पुणे प्रादेशिक विभागातील ८७ हजार ४० ग्राहकांचा तर कोकण प्रादेशिक विभागातील ७८ हजार ८२९ ग्राहकांचा समावेश आहे.

## नाशिकच्या विकासाला आधुनिक चित्रनगरी उभारणीने चालना मिळेल

### उपमुख्यमंत्री अजित पवार; तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश

**मुंबई : हॅलो प्रभात**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताला जागतिक मनोरंजन क्षेत्राचे केंद्र बनविण्याचा दृष्टिकोन मांडला आहे. महाराष्ट्राने या क्षेत्रात आघाडी घ्यावी, या उद्देशाने नाशिक चित्रनगरी प्रकल्प निर्णायक ठरेल. या प्रकल्पामुळे स्थानिक कलाकार, तंत्रज्ञ, लघुउद्योग, हॉटेल व्यवसाय, पर्यटन, वाहतूक व सेवा क्षेत्रांत मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होईल. नाशिकच्या सर्वांगीण, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाला नवे बळ मिळेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला. नाशिक येथे चित्रपटसृष्टी उभारण्यासाठी शासन सकारात्मक आहे. यासाठी नेमलेल्या तज्ज्ञ सल्लागारांचा अहवाल आल्यानंतर त्यातील व्यवहार्यता तपासून, त्याबाबतचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे नाशिक चित्रनगरी प्रकल्पासंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीस अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, दूरदृष्टी प्रणालीद्वारे सांस्कृतिक कार्यमंत्री ड.आशिष शेलार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे-पाटील, दूरदृश्य प्रणालीद्वारे नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्यासह चित्रपट क्षेत्राशी संबंधित पदाधिकारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, नाशिक ही भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांची जन्मभूमी आहे. त्यामुळे नाशिक येथे चित्रपटसृष्टी उभारणे ही फक्त सांस्कृतिक दृष्टीनेच नव्हे, तर आर्थिक, पर्यटन आणि प्रादेशिक विकासाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. महामार्ग, रेल्वे, विमान वाहतूक आणि कुंभमेळ्याच्या निमित्ताने झालेल्या पायाभूत सुविधा या सर्व घटकांमुळे चित्रनगरीच्या निर्मितीसाठी नाशिक सर्वार्थाने अनुकूल आहे. या प्रकल्पाची तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्यता तपासण्यासाठी तज्ज्ञ सल्लागार संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर त्यातील निष्कर्षांच्या आधारे तातडीने अद्ययावत प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

# अ.पा. आर्थिक मागास विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांसाठी प्रशिक्षण उपक्रम

**मुंबई : हॅलो प्रभात**

आर्थिकदृष्ट्या मागास तरुणांना उद्योजक बनवण्यासाठी कार्यरत अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळने आता बँक कर्जावरील व्याज परतावा योजना लाभार्थ्यांना त्यांच्या व्यवसायासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण व मार्गदशन देण्याचा उपक्रम सुरू केला असल्याचे अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्या. मुंबईचे उपमहाव्यवस्थापक आकाश मोरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

महामंडळाकडून विविध जिल्ह्यांमध्ये तज्ज्ञांच्या माध्यमातून ऑनलाईन प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे. यामुळे महामंडळाच्या माध्यमातून तयार झालेल्या उद्योजकांच्या व्यवसाय वाढीस मदत होणार आहे.

हा उपक्रम तरुण उद्योजकांना व्यवसाय यशस्वीपणे चालवण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि कौशल्ये मिळवून देण्याच्या उद्देशाने घेण्यात आला असल्याची माहिती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी दिली.

या उपक्रमातंर्गत महामंडळाच्या वतीने नुकतेच 'पशुपालन आणि दुग्ध व्यवसाय' या विषयावर उद्योग-सारथी प्रशिक्षण कार्यक्रमातंर्गत ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले हाते. त्यात राज्यभरातील इच्छुक लाभार्थ्यांनी सहभाग घेतला. या वेबिनारमध्ये पुणे कृषी विद्यालयाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी मार्गदर्शन केले.

डॉ. माने यांनी दुग्धव्यवसायात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या अनेक बाबींवर प्रकाश टाकला. उत्तम जातीच्या जनावरांची निवड, जनावरांचा आहार, त्यांच्या आरोग्याची काळजी, जनावरांना होणारे आजार आणि त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना याबद्दल सविस्तर माहिती दिली. वेळोवेळी लसीकरण करणे, तसेच आर्थिक नियोजनः दुग्धव्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक भांडवल, शासनाच्या विविध योजना, तसेच दुधाची विक्री आणि मार्केटिंग, दुधाचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि व्यवस्थापन सोपे करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख याबद्दलही त्यांनी मार्गदर्शन केले.

## राज्यातील ७५,००० प्रशिक्षणार्थ्यांना मिळणार कौशल्यांचे प्रशिक्षण : मंत्री मंगलप्रभात लोढा

**मुंबई : हॅलो प्रभात**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे युवकांना उद्योग सुसंगत आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण प्रदान करण्याच्या उद्देशाने ङ्गअल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रमङ्ख हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाचे ऑनलाईन उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ८ ऑक्टोबर २०२५ रोजी करण्यात येणार आहे, अशी माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मंत्रालय येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.



या उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी राज्यभरात ६०० ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, या कार्यक्रमांना विश्वकर्मा समाजातील कारागीर, स्थानिक कलाकार व पारंपरिक व्यवसायातील तज्ज्ञ यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले जाईल. या माध्यमातून त्यांच्या योगदानाला सन्मान मिळेल आणि समाजातील पारंपरिक कौशल्यांविषयी आदरभाव वाढेल. या कार्यक्रमांतर्गत राज्यातील ४१९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि १४१ शासकीय तांत्रिक विद्यालयांमध्ये एकूण २,५०६ तुकड्या सुरू करण्यात येणार आहेत. या माध्यमातून चालू वर्षात ७५,००० प्रशिक्षणार्थ्यांना रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षण दिले जाणार असून, पुढील वर्षापासून ही संख्या १ लाख प्रशिक्षणार्थ्यांपर्यंत वाढविण्याचा संकल्प विभागाने केला आहे.

हॅलो प्रभात
# अहिल्यानगर
जिल्हा विशेष ■ बुधवार, ०८ ऑक्टोंबर २०२५





# थंडीच्या तोंडावर वातावरण तापायला सुरुवात!

**कोपरगाव : विनोद जवरे**

राज्यातील बहुप्रतिक्षित नगराध्यक्ष पदाची आरक्षण सोडत सोमवार दि ६ ऑक्टोबर रोजी राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात संपन्न होऊन या आरक्षण सोडतीत अहिल्यानगर जिल्ह्यातील राजकीय दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे असलेल्या कोपरगाव नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी नगराध्यक्ष पदाचे आरक्षण नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी राखीव झाल्याने उमेदवारी मिळवण्यासाठी मोठी चढाओढ होण्याची शक्यता या जाहीर झालेल्या आरक्षण प्रवर्गातून दिसून येत आहे.

या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आशुतोष

### कोपरगाव नगराध्यक्षपदासाठी नागरिकांचा मागास प्रवर्ग आरक्षण जाहीर




काळे व भाजपाचे युवा नेते विवेक कोल्हे यांच्या गटाच्या उमेदवारामध्येच प्रमुख लढत होणार असली तरी या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, शिवसेना एकनाथ शिंदे गट, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट, काँग्रेस पक्ष हे काय निर्णय घेतील याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे तर शहरातील गल्ली बोळात ऐन थंडीच्या तोंडावर वातावरण गरम होयला सुरुवात झाली आहे.

कोपरगाव नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदासाठी माजी अपक्ष नगराध्यक्ष विजय वहाडणे, मागील वेळी उमेदवारी केलेलं कोल्हे गटाचे पराग संधान आदी प्रमुख उमेदवारासह गेल्या अनेक वर्षात कायम चर्चेत असलेले आदिनाथ ढाकणे यांची नावे चर्चेत आहेतच परंतु यात आमदार काळे व युवानेते कोल्हे काय निर्णय घेता कुणाला उमेदवारी जाहीर करता हा निर्णय सर्वात महत्वाचा ठरणार आहे.

## महर्षी वाल्मिकी यांचे कार्य प्रेरणादायी : बबन चौगुले



**कोतोली : हॅलो प्रभात**

श्रीपतराव चौगुले आर्टस् अॅण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी–कोतोली येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने महर्षी वाल्मीक जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महर्षी वाल्मीक यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. पूजनकार्य महाविद्यालय विकास समिती सदस्य बबन चौगुले यांच्या हस्ते पार पडले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील होते. यावेळी सचिव शिवाजीराव पाटील, डॉ.बी.एन.रावण, डॉ.एस.एस. कुरलीकर, प्रा.ए.आर.महाजन, प्रा.एम.वाय.पोवार उपस्थित होते.कार्यक्रमात विद्यार्थिनी वैष्णवी पाटील हिने महर्षी वाल्मीक यांच्या कार्याविषयी माहिती दिली. सुकन्या पोवार हिने प्रास्ताविक केले, तर गायत्री पाटील हिने आभार मानले. कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन अरविंद कांबळे यांनी केले. याप्रसंगी सर्व प्राध्यापकवर्ग, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कुमावत क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षपदी नितीन ब्रम्हपुरे



### तर उपाध्यक्षपदी मिनाक्षी कुंभार

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कुमावत को–ऑफ क्रेडिट सोसायटी लि., कोल्हापूरच्या अध्यक्षपदी नितीन ब्रम्हपुरे तर उपाध्यक्षपदी सौ.मिनाक्षी कुंभार यांची एकमताने निवड करण्यात आली.या निवडणुकीसाठी निर्णय अधिकारी म्हणून सौ. गायत्री सुधीर साळसकर, मुख्य लिपीक, अधिन उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर शहर, कोल्हापूर यांनी काम पाहिले.कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक माजी महापौर व मावळते अध्यक्ष मे. मारुतीराव कातवरे यांनी केले. यावेळी संस्थेचे संचालक मारुतराव कातवरे, दिपराज माजगांवकर, सतिश कुंभार, विलास कुंभार, शहाजी कुंभार, मारुती कुंभार, सुभाष कुंभार, सागर वडणगेकर, जनार्दन कांबळे, सौ.शोभा माजगांवकर तसेच मॅनेजर महेश कुंभार व सर्व कर्मचारी उपस्थित होते.नुतन अध्यक्ष नितीन ब्रम्हपुरे यांनी सभासदांचा विश्वास संपादन करून संस्थेचा कारभार पारदर्शक ठेवण्याचे, तसेच सभासद व कर्जदारांच्या हितासाठी काम करून सोसायटीची अधिकाधिक प्रगती साधण्याचे आश्वासन दिले.

## ‘स्टॅनफर्ड युनिव्हर्सिटी’ संशोधकांच्या यादीत ‘संजीवनी’चा समावेश

### डॉ.सय्यद व डॉ. विल्यम यांचा समावेश

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

संजीवनी इंजिनिअरींग कॉलेज व संजीवनी युनिव्हर्सिटीच्या अशा दोन संशोधक प्राध्यापकांनी अमेरिकेत आपल्या संशोधनाचा झेंडा फडकवीला. तेथील स्टॅनफर्ड युनिव्हर्सिटीने नुकतीच जगातील सर्वोच्च संशोधन असणा–या पहिल्या दोन टक्के संशोधकांची यादि प्रसिध्द केली. त्यात संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या सिव्हिल आणि स्ट्रक्चरल इंजिनिअरींग विभागाचे प्रमुख डॉ. ए. एस. सय्यद आणि संजीवनी युनिव्हर्सिटीच्या रिसर्च अँड डेव्हलपमेंट विभागाचे डायरेक्टर डॉ. पी. विल्यम यांचा समावेश आहे. या निमीत्ताने जगभरातील सहा लाख संशोधकात या दोघांची उच्चस्तरीय संशोधक म्हणून गणना झाली. संजीवनी शैक्षणीक संकुल आणि युनिर्व्हसिटीच्या दृष्टीने हि भुषणावह बाब आहे.




अशी प्रतिक्रीया संजीवनी युनिर्व्हसिटीचे प्रेसिडेंट अमित कोल्हे यांनी दिली. संजीवनीच अध्यक्ष श्री नितीनदादा कोल्हे यांनी या डिओघांचेही अभिनंदन केले. युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट श्री अमित कोल्हे यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी संजीवनी युनिव्हर्सिटीचे व्हाईस चांसलर डॉ. ए. जी. ठाकुर व संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजचे डायरेक्टर डॉ. एम. व्ही. नागरहल्ली उपस्थित होते.

यावेळी बोलताना कोल्हे म्हणाले, जगभरातील सहा लाख संशोधकांत भारतातील केवळ ६ हजार २३१ संशोधकांचा समावेश आहे त्यात संजीवनीच्या दोघा संशोधक प्राध्यापकांचा समावेश आहे.

डॉ. सय्यद यांनी आंतरराष्ट्रीय जर्नल्स मध्ये १७५ हुन अधिक संशोधनात्मक प्रबंध सादर केले. विविध संशोधनांसाठी त्यांना २० पेटंट मिळाले. त्यांची दहा पुस्तके प्रसिध्द झाली आहेत. डॉ. विल्यम यांनी २२७ हून अधिक आंतराष्ट्रीय जर्नल्समध्ये संशोधनात्मक प्रबंध प्रसिध्द केले. विविध संशोधनाची त्यांनी एकुण १२ पेटंट मिळवीली आहेत.त्यांची २१ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

> संजीवनी इनिअरिंग कॉलेज मध्ये संशोधनपूरक वातावरण आहे. सुसज्ज प्रयोग शाळा आणि ग्रंथालय उपलब्ध आहे. त्यामुळे संशोधन करण्यासाठी सकारात्मक ऊर्जा मिळते. व्यवस्थापनाचे पाठबळ आणि प्रोत्साहन मिळते. माझ्या संशोधनाची जागतिक पातळीवर घेतलेली नोंद आम्हा सर्व संशोधकांचा उत्साह वाढवीणारी आहे.
>
> **– डॉ.ए. एस.सय्यद**

> स्टॅनफर्ड युनिव्हर्सिटीने निवडलेल्या जगभरातील सहा लाख संशोधकांमध्ये सर्व क्षेत्रातील संशोधकांचा समावेश आहे. त्यात संशोधन कार्याचा मानवतेसाठी उपयोग, संशोधनास संबंधित संस्थाकडून मिळालेली मान्यता आणि नाविन्य हे निकष लावले जातात. माझ्या संशोधनाची जागतिक पातळीवर दखल घेण्यात आली. त्याचे श्रेय संजीवनी युनिर्व्हसिटीने उपलब्ध करून दिलेल्या संशोधनपुरक वातावरणाला देखील आहे.
>
> **–डॉ.पी.विल्यम**

## यश बोरुडे पोस्टर स्पर्धेत जिल्ह्यात पहिला

**राहुरी : हॅलो प्रभात**



पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय पोस्टर (चित्रकला) स्पर्धेत राहुरी येथील कै. लालाशेठ बिहाणी विद्यामंदिर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील यश दिलीप बोरुडे याने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.या स्पर्धेचे आयोजन प्रथम तालुकास्तरावर करण्यात आले होते. तालुका पातळीवर उत्कृष्ट प्रदर्शन करत यश बोरुडे याच्या चित्राची निवड जिल्हास्तरीय फेरीसाठी करण्यात आली होती. जिल्हास्तरावर इयत्ता ११वी ते १२वी गटात त्याने आपल्या कलाकृतीच्या माध्यमातून पहिला क्रमांक मिळवत राहुरी तालुक्याचा मान वाढविला.या यशाबद्दल राहुरी एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा सौ. प्रभावतीताई सतीश बिहाणी, संस्थेचे सचिव मनोज बिहाणी, सहसचिव अनुप बिहाणी, विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक राहुल जगताप, ज्येष्ठ शिक्षक भाऊसाहेब मोरे, बाबासाहेब गुंजाळ तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यश बोरुडे याचे मनःपूर्वक अभिनंदन केले.संस्थेच्या वतीने सांगण्यात आले की, यश याने मेहनत, सर्जनशीलता आणि कलात्मकता यांचा सुंदर संगम साधत राहुरीचे नाव जिल्हा पातळीवर उज्ज्वल केले आहे. त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## बचत गट चळवळीने महिला आत्मनिर्भर झाल्या : स्नेहलता कोल्हे

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रेरणेने महिला आर्थिक विकास महामंडळ अहिल्यानगर क्रांती लोकसंचलित साधन केंद्र कोपरगाव यांच्या १४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेनिमित्त मा. आ. स्नेहलताताई कोल्हे उपस्थित होत्या. यावेळी मनोगत व्यक्त करताना महिला बचत गट चळवळीमुळे खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर झाल्या असे सांगून महिलांना अर्थक्रांतीची जोड मिळाल्याने कौटुंबिक विकासाबरोबर सामाजिक परिवर्तनाचे देखील दार खुले झाल्याचे मत व्यक्त केले. आज एकविसाव्या शतकातील महिला कुठेही मागे नसून आपल्या बौद्धिक क्षमतेवर त्यांनी नावलौकिक प्राप्त केला आहे.चूल आणि मूल याच्या पलीकडे महिला सक्षमपनाने प्रत्येक क्षेत्रामध्ये आपल्या ठसा उमटवू शकतात हे आता सिद्ध होऊ लागले आहे.

मी देखील बचत गटाची एक सदस्य म्हणून माझ्या सामाजिक जीवनाची सुरुवात केली त्यातून राजकीय प्रवास घडला अशी आठवण सांगितली.महिला आर्थिक विकास महामंडळाचे कौतुक केले.संस्थेच्या विकासाची घोडदौड होते आहे मात्र या सोबतच महिलांनी केलेली अर्थक्रांती कायम महत्वाची मानली जाईल.

बचत गटाच्या चळवळीने महिला आत्मनिर्भर होता आहे याचे कौतुक केले. जिल्हा समन्वयक अधिकारी उमेश कहाते, आर बी डी सी चे नवनाथ नाईक, आय सी आय सी आय बँकेचे प्रतिनिधी सय्यद साहेब, एचडीएफसी मॅनेजर किरण शिंदे, टेक्निकल वॉलमार्ट चे मॅनेजर कमल जी, केंद्राच्या माजी अध्यक्ष उषाताई निकम, विद्यमान अध्यक्ष सविता पगारे, कोपरगाव तालुक्याच्या व्यवस्थापक सविताताई परदेशी, सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे अभिमानाची बाब : प्रा.डॉ. विजय ठाणगे

**कोपरगाव : विनोद जवरे**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे ही समस्त मराठी जणांसाठी आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. मराठी भाषा आणि साहित्य याचा इतिहास अत्यंत प्राचीन आणि गौरवशाली असा असल्याने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे आवश्यकच होते. विद्यार्थ्यांनी आपल्या मराठीचे सखोल ज्ञान प्राप्त करणे आणि बारकावे समजून घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ ग्रामीण कवी लक्ष्मण बारहाते यांनी येथे केले.

स्थानिक के.जे. सोमैया महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने आयोजित 'अभिजात मराठी भाषा दिन' समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून बारहाते बोलत होते.



अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय ठाणगे होते.

याप्रसंगी श्री. बाराहाते यांनी मराठी भाषेतील शब्द, वाक्य, वाक्प्रचार, म्हणी आदी बारकावे विद्यार्थ्यांना समजावून सांगत त्याचे वाचन, चिंतन, मनन आणि कृती केले पाहिजे असेही सांगितले.

त्याचबरोबर त्यांनी आपल्या 'वाटून खावा घास', 'शब्द' आदी कविता सादर करून उपस्थितांनी मने जिंकली.अध्यक्ष स्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ. विजय ठाणगे म्हणाले की, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे ही अत्यंत स्वागतयोग्य व अभिमानाची बाब आहे. दैनंदिन जीवनाबरोबरच स्पर्धा परीक्षांमध्ये देखील भाषा अत्यंत महत्त्वाची आहे, परंतु अलीकडे विद्यार्थ्यांमध्ये दिसून येणारी अनास्था आणि उदासीनता चिंताजनक आहे. पदवीधर होऊन नोकरी मिळत नाही अशी ओरड करण्यापेक्षा विद्यार्थ्यांनी गंभीर होऊन मातृभाषा मराठीचे ज्ञान गांभीर्याने संपादन करून ते कृतीत उतरविल्यास रोजगाराचे दरवाजे आपोआप उघडतील.

याप्रसंगी हिंदी विभाग प्रमुख डॉ. जिभाऊ मोरे, वाणिज्य शाखेचे डॉ. संजय अरगडे, डॉ. रवींद्र जाधव यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. संपत आहेर यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. विनोद शिनगारे यांनी केले. प्रा. नवनाथ वैद्य यांनी उपस्थितांचे आभार मानले.

प्रा. अमोल बंद्रे, प्रा. प्रवीण मोरे, प्रा.अमोल चिने, प्रा.किरण सोळसे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

## प्रभाग क्र.१० मध्ये विकासकामांचा शुभारंभ

**हुपरी : हॅलो प्रभात**

खा.धैर्यशील माने यांच्या खासदार फंडातून मंजूर आणि शिवसेना हातकणंगले तालुका प्रमुख अजितराव सुतार,युवासेना हुपरी शहर प्रमुख अजित उगळे यांच्या सातत्याने केलेल्या पाठपुराव्याने मंजूर झालेल्या १७ लाखाच्या विकास कामांच्या भव्य शुभारंभ वाळवेकर नगर प्रभाग क्रमांक १० येथील गल्ली क्रमांक १४ व १५ येथे प्रमुख मान्यवरांच्या शुभ हस्ते संपन्न होणार आहे. तरी सर्व नागरिक बंधूंनी सकाळी ९ वाजता, वाळवेकर नगर गल्ली नंबर १४ या ठिकाणी उपस्थित राहण्याचे आवाहन युवा सेना हुपरी शहर प्रमुख अजित उगळे यांनी केले आहे.

## राहुल महाडिक यांच्या वाढदिवसानिमित्त स्वच्छता मोहीम



**पेठ : हॅलो प्रभात**

राहुलदादा महाडिक यांच्या वाढदिवसानिमित्त एक आगळावेगळा सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. पेठनाका (ता.वाळवा) येथील नानासाहेब महाडिक शैक्षणिक संकुलाच्या महालक्ष्मी औद्योगिक प्रशिक्षण (श्रढख) संस्थेच्या सर्व विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन ऐतिहासिक पन्हाळा किल्ल्यावर स्वच्छता मोहीम हाती घेतली.या मोहिमेत विद्यार्थ्यांनी किल्ल्याच्या परिसरातील प्लास्टिक,पिशव्या,बाटल्या व इतर कचरा गोळा करून परिसर स्वच्छ केला.आणि सामाजिक बांधिलकी जोपासत वाढदिवस साजरा करण्याची ही अनोखी पद्धत सर्वत्र कौतुकास्पद ठरली.विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून पर्यावरण संरक्षण,स्वच्छता आणि ऐतिहासिक वारसा जपण्याचा संदेश दिला. स्वच्छते सोबतच त्यांनी किल्ल्यावर आलेल्या पर्यटकांना ही कचरा न फेकण्याचे आवाहन केले.या उपक्रमामुळे राहुलदादांचा वाढदिवस एक वेगळी ओळख घेऊन साजरा झाला. समाजहितासाठी काम करण्याची प्रेरणा देत तरुणाईने सर्वांना एक सकारात्मक संदेश दिला.याप्रसंगी प्राचार्य आदर्श पाटील,सचिन दळवी,सुनील पाटील, विजय पाटील स्वप्नील पाटील,शुभम सकटे त्याच बरोबर सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# राहुरी ‘नगराध्यक्ष’ पद आता ‘एसटी पुरुष ’

**राहुरी : हॅलो प्रभात**

महाराष्ट्रातील नगरपरिषदांतील नगराध्यक्ष पदासाठी आरक्षण सोडत आज जाहीर झाली असून, राहुरी शहरासाठी हे पद अनुसूचित जमाती (एसटी) पुरुष या प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आले आहे.या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून नगराध्यक्षपदाच्या शर्यतीत अग्रस्थानी राहिलेले पारंपरिक दावेदार बाजूला पडले असून, शहराच्या राजकीय वर्तुळात एक प्रकारची खळबळ निर्माण झाली आहे. आरक्षण जाहीर झाल्यानंतर, राहुरी शहरातील अनेक प्रमुख राजकीय नेत्यांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण आहे. दीर्घकाळापासून तयारीत असलेल्या अनेक दावेदारांची आशा एका झटक्यात संपुष्टात आल्याने त्यांच्या समर्थकांमध्ये नाराजीचे सूर उमटत आहेत. मात्र दुसरीकडे, अनुसूचित जमातीसाठी हे पद राखीव झाल्याने समाजातील सर्वसामान्य कुटुंबांतील उमेदवारांना संधी मिळणार असल्याचा आनंद व्यक्त करण्यात येतो आहे.




सध्या शहरात माजी नगरसेवक कैलास माळी, पै, महाराष्ट्र केसरी गुलाब बर्डे माजी नगरसेवक सुनील नाना पवार, डॉ. अंगराज पवार, आणि गोरख नाना बर्डे ही नावे चर्चेत असून, या पैकी कोणी मैदानात उतरणार याकडे राजकीय वर्तुळात आणि नागरिकांमध्ये मोठे लक्ष लागले आहे.

स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या या नेत्यांची जनसंपर्क क्षमता आणि सामाजिक भान लक्षात घेता, निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राहुरी शहरातील पारंपरिक राजकीय पक्ष, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, आरपीआय, वंचित बहुजन आघाडी या पक्षांचा प्रभाव असून, हे उमेदवार पक्षाच्या अधिकृत चिन्हावर लढणार की स्थानिक स्तरावरील जनसेवा मंडळ अथवा विकास मंडळ यांसारख्या प्रस्थापित गटांच्या माध्यमातून लढणार, यावरही उत्सुकतेचे वातावरण आहे.

> नागरिकांमध्ये चर्चा
>
> राहुरी शहरातील नागरिक सध्या सोशल मिडिया,चावडी व सार्वजनिक ठिकाणी याविषयी चर्चेत व्यस्त आहेत. नगराध्यक्षपदाच्या राजकीय समीकरणात अचानक झालेले हे बदल पुढील राजकारणाची दिशा निश्चित करणार असल्याने, स्थानिक राजकारणात नव्या घडामोडी घडतील,अशी शक्यता आहे.